


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १८६ * नांदेड * मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# जेजुरीजवळ नांदेडच्या ट्रकने ७ वारकऱ्यांना चिरडले

## वारीदरम्यान दुर्घटना: ट्रकच्या धडकेत ३ महिलांचा मृत्यू

**जेजुरी/ नांदेड (प्रतिनिधी)–** आषाढी वारीसाठी निघालेल्या पालखी सोहळ्यातील महिलांना भीषण अपघाताने गाठले. येथे नांदेडच्या ट्रकने ७ वारकऱ्यांना चिरडले असून यातील ३ महिला वारकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर ४ महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. ही घटना रविवारी सकाळी ८:३० वाजेच्या सुमारास जेजुरीजवळ घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, याठिकाणी वाहतूक व्यवस्थापनासाठी रस्ता डिव्हायडरद्वारे विभागण्यात आला आहे. उजवा मार्ग वाहनांसाठी तर डावा मार्ग पायी वारकऱ्यांसाठी राखीव आहे. यावेळी सांगली जिल्ह्यातील कसबे दिग्रज येथील दिंडीतील ७ महिला वारकरी वाहनांच्या मार्गावरून चालत होत्या. त्याचवेळी नांदेड जिल्ह्यातील लोहा येथील रंगनाथ महाराज पोखरबिसीकर यांच्या दिंडीचा




ट्रक वाहनांसाठी राखीव असलेल्या उजव्या मार्गाने जेजुरीकडे जात होता. दुसऱ्या वाहनाला ओव्हरटेक करताना ७० वर्षीय ट्रकचालकाने अचानक ट्रक डाव्या बाजूला वळवला आणि रस्त्यावर असलेल्या ७ महिलांना चिरडले. चालक ताप व सर्दीसाठी औषधे घेऊन अस्वस्थ असल्याचे तपासात समोर आले आहे.

या अपघातात नंदा पवार वय ६० वर्षे, रा. कवलापूर, ता. मिरज, जि. सांगली, माधवी राजाराम सालगरे वय ५५ वर्षे, रा. मालगाव, ता. मिरज, जि. सांगली आणि राजश्री शंकर भोसले वय ५५ वर्षे, रा. कसबे दिग्रज, ता. मिरज, जि. सांगली यांचा मृत्यू झाला आहे. अपघातातील इतर ४ जखमी महिलांना तातडीने जेजुरी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

माहिती मिळताच जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी शिलिमकर आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बचावकार्य, वाहतूक नियंत्रण, पंचनामा व कायदेशीर कारवाईचे प्रत्यक्ष पर्यवेक्षण केले.

अपघातास कारणीभूत असलेल्या सर्व बाबींची सखोल चौकशी सुरू आहे. चालकाची वैद्यकीय स्थिती व वर्तणुकीची तपासणी केली जात असून कायद्यानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण पालखी सोहळ्यावर शोककळा पसरली आहे. वारकरी सांप्रदायाने ही मोठी हानी असल्याचे सांगत मृतांना श्रद्धांजली वाहिली.

# वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच रात्री दोन खून; ३ आरोपी अटकेत

## बंदाघाट आणि मध्यवर्ती बसस्थानकात चाकूने वार करून हत्या



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवारी रात्री दोन वेगवेगळ्या ठिकाणी खुनाच्या घटना घडल्या. यातील एक घटना बंदाघाट परिसरात तर दुसरी मध्यवर्ती बसस्थानकात घडली. दोन्ही प्रकरणातील तीन आरोपींना पोलिसांनी काही तासांतच अटक केली आहे.

बंदाघाट परिसरात मिस्त्री काम करणारे आणि गेल्या ८ ते १० वर्षांपासून नांदेडमध्ये वास्तव्यास असले हरियाणाचे अमित वर्मा वय ४० आणि पंजाबचे महावीरसिंग सुखदेवसिंग संधू वय ३५ हे दोघे एकत्र राहत होते. रविवारी रात्री दोघांनीही दारू पिऊन बंदाघाट परिसरात गेले होते. यावेळी महावीरसिंघने अमितकडे पुन्हा १०० रुपयांची मागणी केली. अमितने पैसे देण्यास नकार दिल्याने त्यांच्यात वाद झाला. रागाच्या भरात महावीरसिंगने जवळील चाकूने अमितच्या दंडावर आणि मानेखाली वार केले. गंभीर जखमी झालेल्या अमितचा अतिरक्तस्त्रावामुळे विष्णुपुरी येथील शासकीय (पान ३ वर...)

गोदातीर समाचार



### विनम्र अभिवादन

भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. शंकररावजी चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन.

**–संपादक**






















जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# आता तरी शेतकरी महिलांना न्याय मिळेल?

भारतीय शेतीची खरी ताकद जर कोणामध्ये असेल, तर ती ग्रामीण महिलांमध्ये आहे. पहाटेपासून रात्रीपर्यंत घरातील जबाबदाऱ्या सांभाळतानाच शेतातील पेरणी, लावणी, निंदणी, कापणी, पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि इतर पूरक उद्योगां-मध्ये महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. तरीही अनेक दशकांपासून त्यांच्या श्रमाची दखल घेतली गेली नाही. शेतीत प्रत्यक्ष राबूनही जमीन त्यांच्या नावावर नसल्यामुळे त्यांना कायद्याच्या दृष्टीने 'शेतकरी' म्हणून मान्यता मिळत नव्हती. महाराष्ट्र सरकारने महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ मंजूर करून ही ऐतिहासिक विसंगती दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. हा निर्णय केवळ कायद्यातील बदल नसून ग्रामीण समाजव्यवस्थेत समानतेचा आणि न्यायाचा नवा अध्याय ठरू शकतो. देशातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचे योगदान अत्यंत मोठे आहे. आर्थिकदृष्ट्या सक्रिय असलेल्या ग्रामीण महिलांपैकी ८० टक्क्यांहून अधिक महिला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेती आणि कृषीपूरक व्यवसायांमध्ये कार्यरत आहेत. मोठ्या प्रमाणावर महिला कौटुंबिक शेतीत काम करतात, तर अनेक महिला कृषी मजूर किंवा पशुपालन, दुग्धव्यवसाय अशा क्षेत्रांत कार्यरत आहेत. मात्र, कृषी जनगणनेनुसार देशातील एकूण शेतजमिनींपैकी अत्यल्प जमीन महिलांच्या नावावर आहे. परिणामी, सरकारी योजना, कर्ज, पीकविमा, अनुदान किंवा आर्थिक सवलतींचा लाभ घेण्याच्या बाबतीत त्यांना दुय्यम स्थान मिळत राहिले. आजपर्यंतची शासकीय व्यवस्था जमिनीच्या मालकीवर आधारित होती. सातबाऱ्यावर नाव असलेली व्यक्तीच शेतकरी मानली जात असल्याने लाखो महिला प्रत्यक्ष शेती करत असूनही सरकारी नोंदींमध्ये केवळ कुटुंबातील सदस्य किंवा मजूर म्हणून गणल्या जात होत्या. 'प्रधानमंत्री किसान'सारख्या योजनांमध्येही महिलांचा सहभाग मर्यादित राहण्यामागे हेच प्रमुख कारण आहे. वारसा हक्क, कौटुंबिक प्रथा आणि महसूल कायद्यांतील गुंतागुंत यामुळे महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून मान्यता देणे प्रशासनासाठी कठीण ठरत होते. नवीन विधेयकाने या मानसिकतेलाच छेद दिला आहे. आता केवळ जमिनीची मालकी हा निकष न ठेवता शेती आणि कृषीपूरक क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिलांना कायदेशीररित्या 'महिला शेतकरी' म्हणून ओळख दिली जाणार आहे. त्यामुळे त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण होईल आणि भविष्यात विविध शासकीय योजनांचा लाभ थेट त्यांच्यापर्यंत पोहोचविणे अधिक सुलभ होईल. ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने हे मोठे पाऊल मानावे लागेल. गेल्या काही दशकांत रोजगाराच्या शोधात ग्रामीण भागातील पुरुष मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थलांतरित झाले. त्यामुळे शेतीची संपूर्ण जबाबदारी महिलांच्या खांद्यावर आली. उत्पादनाचे नियोजन, मजुरांचे व्यवस्थापन, पिकांची देखभाल, बाजारपेठेशी संपर्क अशा अनेक जबाबदाऱ्या महिलांनी समर्थपणे सांभाळल्या. तरीही त्यांना निर्णयक्षम आर्थिक घटक म्हणून मान्यता मिळाली नाही. नवीन कायद्यामुळे या वास्तवाला अधिकृत मान्यता मिळत असून महिलांच्या आत्मविश्वासात आणि सामाजिक प्रतिष्ठेत निश्चितच वाढ होईल. संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे वर्ष महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केलेल्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राने घेतलेला हा निर्णय देशासाठी दिशादर्शक ठरू शकतो. इतर राज्यांनीही या अनुभवाचा अभ्यास करून महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर दर्जा देण्याचा विचार करणे आवश्यक आहे. महिलांशिवाय भारतीय शेतीची प्रगती अशक्य आहे, हे वास्तव आता धोरणांमध्येही प्रतिबिंबित होणे ही काळाची गरज आहे. तथापि, केवळ कायदा करून उद्दिष्ट साध्य होणार नाही. आपल्या देशामध्ये उदंड कायदे आहेत पण त्याची अंमलबजावणी करणारा तुकाराम मुंढे यांच्यासारखा एखादाच अधिकारी असतो बाकीचे सगळे पाकीट गोळा करणारे असतात. तेव्हा या नवीन कायद्याचा खरच उपयोग होईल का, हाही महत्त्वाचा प्रश्न आहे. तेव्हा महिला शेतकऱ्यांची स्वतंत्र नोंदणी, ओळखपत्रे, बँक कर्ज, पीकविमा, कृषी प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठेपर्यंत थेट प्रवेश, स्वयं-सहाय्यता गटांना बळकटी आणि वारसा हक्काबाबत जनजागृती अशा अनेक पूरक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी लागेल. अन्यथा हा कायदा केवळ कागदावरच मर्यादित राहण्याचा धोका आहे. महिला शेतकरी ही केवळ शेतातील मजूर नसून अन्नसुरक्षेची खरी शिल्पकार आहे. तिच्या श्रमाला न्याय, तिच्या कर्तृत्वाला सन्मान आणि तिच्या अधिकारांना कायदेशीर संरक्षण मिळणे ही केवळ सामाजिक समानतेची बाब नसून देशाच्या कृषी विकासाची पूर्वअट आहे. महाराष्ट्राने उचललेले हे पाऊल निश्चितच स्वागतार्ह आहे. आता या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामीण महिलांच्या जीवनात खऱ्या अर्थाने आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक सन्मान निर्माण करण्याची जबाबदारी शासन आणि समाज या दोघांवरही तितकीच आहे.

# महाराष्ट्राचे विकासपुरुष : डॉ. शंकरराव चव्हाण



डॉ. शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ, कर्तृत्ववान आणि दूरदृष्टी असलेले महान नेते होते. आपल्या शांत, संयमी आणि शिस्तप्रिय स्वभावामुळे त्यांनी राजकारणात एक वेगळी ओळख निर्माण केली. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेची निष्ठा ही त्यांच्या व्यक्ति-मत्त्वाची प्रमुख वैशिष्ट्ये होती.

महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी त्यांनी प्रशासन अधिक सक्षम करण्यावर भर दिला. शिक्षणाचा प्रसार, सिंचन विकास, शेती आणि ग्रामीण भागाच्या उन्नतीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. विकासाकडे पाहण्याचा त्यांचा व्यापक दृष्टिकोन आणि समाजहिताची भावना यामुळे ते महाराष्ट्राच्या विकासयात्रेतील एक महत्त्वाचे शिल्पकार ठरले.

त्यांच्या कार्यातून नेतृत्वातील शिस्त, दूरदृष्टी आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यांचा आदर्श आजही प्रेरणादायी आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण यांचा जन्म १४ जुलै १९२० रोजी झाला. ग्रामीण वातावरणात वाढल्यामुळे त्यांना सामान्य जनतेच्या समस्या, शेती आणि ग्रामीण जीवनाची जवळून जाणीव झाली. त्यांनी उच्च शिक्षण घेऊन कायद्याचे शिक्षण पूर्ण केले आणि समाजातील प्रश्न समजून घेण्याची दृष्टी विकसित केली. शिक्षणामुळे त्यांच्यात तर्कशक्ती, निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुण विकसित झाले.

कायदेविषयक ज्ञान, सामाजिक जाणीव आणि लोकांच्या प्रश्नांबद्दलची संवेदनशीलता यामुळे त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रभावी नेतृत्व केले. पुढे याच गुणांच्या आधारावर त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आणि प्रशासनात महत्त्वाचे स्थान निर्माण केले.

डॉ. शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून दोन वेळा राज्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनात शिस्त, कार्यक्षमता आणि नियोजनबद्ध विकासाला विशेष महत्त्व देण्यात आले.

मुख्यमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले. पायाभूत सुविधा, शेती, सिंचन, शिक्षण आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांच्या प्रगतीसाठी त्यांनी महत्त्व-पूर्ण निर्णय घेतले. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविणे, ग्रामीण भागात विकासाच्या सुविधा पोहोचविणे आणि राज्याच्या विकासासाठी दीर्घकालीन नियोजन करणे यावर त्यांनी भर दिला.

त्यांच्या कार्यकाळात प्रशासन अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न झाला. शांत, संयमी आणि दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या विकासाला एक नवी दिशा दिली. त्यामुळे त्यांना महाराष्ट्राच्या विकासयात्रेतील एक महत्त्वाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते.

डॉ. शंकरराव चव्हाण यांचे नेतृत्व नेहमीच विकासाभिमुख आणि दूरदृष्टीपूर्ण राहिले. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी केवळ तात्कालिक निर्णयांवर भर न देता दीर्घकालीन नियोजन आणि शाश्वत विकासाच्या धोरणांना प्राधान्य दिले.

शेतकरी, ग्रामीण जनता आणि सामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या कल्याणासाठी त्यांनी संवेदनशीलतेने कार्य केले. शेती, सिंचन, शिक्षण, रोजगार आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांमध्ये प्रगती घडवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. विकासकामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि कार्यक्षम प्रशासन यांना त्यांनी विशेष महत्त्व दिले. जबाबदार निर्णयक्षमता, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि जनहिताला केंद्रस्थानी ठेवणारे धोरण यामुळे त्यांचे नेतृत्व आदर्श मानले जाते. त्यांच्या विकासाच्या विचारसरणी-मुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला नवी दिशा मिळाली आणि एक सक्षम प्रशासक म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ झाली.

डॉ. शंकरराव चव्हाण हे एक कुशल, शिस्तप्रिय आणि कार्यक्षम प्रशासक म्हणून ओळखले जात होते. प्रशासना-तील बारकावे समजून घेण्याची त्यांची क्षमता आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची हातोटी ही त्यांच्या नेतृत्वाची प्रमुख वैशिष्ट्ये होती. त्यांचा शांत स्वभाव, संयमी वृत्ती आणि शिस्तबद्ध कार्यपद्धती यामुळे प्रशासनात स्थैर्य आणि विश्वासाचे वातावरण निर्माण झाले. कोणताही निर्णय घेताना त्यांनी जनहित, विकास आणि दीर्घकालीन परिणाम यांचा विचार केला. त्यांनी प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि प्रभावी बनविण्याचा प्रयत्न केला. सामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या कार्यशैलीमुळे ते केवळ राजकीय नेते नव्हे, तर एक आदर्श प्रशासक म्हणूनही महाराष्ट्राच्या इतिहासात स्मरणात राहिले.

डॉ. शंकरराव चव्हाण यांनी राज्याच्या राजकारणाबरोबरच राष्ट्रीय पातळीवरही महत्त्वपूर्ण भूमिका बजा-वली. भारत सरकारमध्ये त्यांनी विविध महत्त्वाची मंत्रीपदे भूषवून देशाच्या प्रशासनात मोलाचे योगदान दिले. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री म्हणून देशाच्या अंतर्गत सुरक्षा, प्रशासन व्यवस्था आणि राष्ट्रीय एकात्मता यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर काम केले. तसेच केंद्रीय अर्थमंत्री म्हणून देशाच्या आर्थिक धोरणांमध्ये योगदान दिले.

राष्ट्रीय स्तरावर काम करताना त्यांनी आपल्या अनुभवाचा, प्रशासकीय कौशल्याचा आणि दूरदृष्टीचा उपयोग केला. त्यांच्या शांत, संयमी आणि जबाबदार कार्यशैलीमुळे केंद्र सरकारमध्येही त्यांना एक विश्वासार्ह आणि सक्षम नेता म्हणून मान्यता मिळाली.

महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता देशाच्या विकासात योगदान देणारे नेते म्हणून त्यांचे कार्य कायम स्मरणात राहिले.

डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या कार्या-मध्ये ग्रामीण विकासाला विशेष महत्त्वाचे स्थान होते. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी ग्रामीण भागाचा विकास आवश्यक आहे, ही जाणीव ठेवून त्यांनी शेती, सिंचन, शिक्षण आणि रोजगारनिर्मिती या क्षेत्रांवर भर दिला. शेतकऱ्यांच्या समस्या, ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांची गरज आणि गावांच्या विकासाची आवश्यकता याकडे त्यांनी संवेदनशीलतेने लक्ष दिले. सिंचनाच्या सुविधा वाढविणे, शेतीला प्रोत्साहन देणे आणि ग्रामीण भागात शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावणे, गावांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे हे त्यांच्या विकासाच्या दृष्टिकोनाचे महत्त्वाचे भाग होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळाली आणि सामान्य जनतेच्या कल्याणाला प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली.

डॉ. शंकरराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व साधेपणा, नम्रता, प्रामाणिकपणा आणि शिस्तप्रियतेने परिपूर्ण होते. सार्वजनिक जीवनात असूनही त्यांनी नेहमी साधी राहणी आणि उच्च विचारसरणी जपली. त्यांच्या शांत स्वभावामुळे आणि संयमी कार्यपद्धतीमुळे ते सर्वांच्या आदरास पात्र ठरले.

सत्तेपेक्षा जनसेवा आणि समाजहिताला अधिक महत्त्व देणारे नेते म्हणून त्यांची ओळख होती. निर्णय घेताना त्यांनी संयम, विवेक आणि दूरदृष्टीचा वापर केला. त्यांच्या नेतृत्वातून जबाबदारी, प्रामाणिकपणा आणि लोककल्याणाची भावना यांचा आदर्श समाजासमोर निर्माण झाला.

डॉ. शंकरराव चव्हाण यांचे कार्य आजही महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे. विकास, शिस्त, प्रशासनातील कार्यक्षमता आणि लोकसेवा या मूल्यांचा आदर्श त्यांनी आपल्या कार्यातून समाजासमोर ठेवला. त्यांनी दाखविलेली विकासाची दिशा आणि जनहिताला केंद्रस्थानी ठेवणारी कार्यपद्धती आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक आहे. त्यांचे जीवन हे जबाबदार नेतृत्व, समर्पण आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणादायी गाथा आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण हे केवळ राजकारणी नव्हते, तर विकासाची दूरदृष्टी असलेले महान प्रशासक होते. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळाली. महाराष्ट्राचे विकासपुरुष म्हणून त्यांचे नाव इतिहासात सदैव आदराने स्मरणात राहील.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड.
मो. ९७६७८३०४९८

# खेळ कुणाला दैवाचा कळला...

मराठी चित्रपट सृष्टीतील आजवरचा सर्वात देखणा नायक, मराठीतील विनोद खन्ना अशी बिरुदावली लागलेला, सत्तर आणि ऐंशीच्या दशकातील मराठी मुलींच्या स्वप्नातील राजकुमार, मराठीतील सुपरस्टार, ज्येष्ठ अभिनेते रवींद्र महाजनी यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी १४ जुलै २०२३ रोजी रवींद्र महाजनी यांच्या निधनाची बातमी आली आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या काळजाचा ठोका चुकला. तसे त्यांचे निधन वयाच्या ७७ व्या वर्षी झाले म्हणजे वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले.

निधनानंतर दोन दिवसांनी पुण्यातील एका सदनिकेत त्यांचा मृतदेह आढळला तेंव्हा सर्व जण हळहळले. त्यांचा अशा प्रकारे मृत्यू होणे हे जितका धक्कादायक आहे तितकेच ते मनाला चटका लावून जाणारेही होते. ज्यांचे आयुष्य प्रेक्षकांच्या गराड्यात गेले त्यांना अशाप्रकारे एकाकी मरण यावे हा दैवाचा अजब खेळ म्हणावा लागेल. त्यांच्याच देवता चित्रपटातील 'खेळ कुणाला दैवाचा कळला....' हे गाणे या निमित्ताने सर्वांना आठवले अर्थात आयुष्यभर



स्टारडम मिळवूनही अशाप्रकारे एकाकी शेवट झालेले रवींद्र महाजनी हे पहिले कलाकार नाहीत याआधी जेष्ठ अभिनेत्री ललिता पवार, दक्षिणेतील सिल्क स्मिता, हिंदी चित्रपटातील नायिका परवीन बाबी, बॉलिवूडची सुपरस्टार श्रीदेवी या कलाकारांचा शेवट देखील अशाच प्रकारे चार भिंतीच्या आत झाला. पैसा आणि प्रसिद्धीसाठी संपूर्ण आयुष्य वेचलेल्या या कलाकारांना उतार वयात पैसा आणि प्रसिद्धी खरंच कामी येतात का...? याचा प्रत्येक कलाकारांनी करायला हवा अर्थात हा विचार फक्त कलाकारांनीच नव्हे तर सर्वांनीच करायला हवा. स्टारडम, पैसा, प्रसिद्धी, सत्ता हे सगळं क्षणभंगुर आहे. खरंच 'खेळ कुणाला दैवाचा कळला' हेच अंतिम सत्य आहे.

रवींद्र महानजी यांचा जन्म ७ ऑक्टोबर १९४९ रोजी बेळगाव येथे झाला. लहानपणाप-ासून त्यांना अभिनयाची आवड होती. शाळेच्या स्नेहसंमेलनात ते आपल्या अभिनयाची हौस भागवून घेत. शालेय जीवनातच ते नाटकात काम करू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर अभिनय क्षेत्रात करियर करण्यासाठी ते मुंबईत आले. मधुसूदन कालेलकर यांनी त्यांना जाणता अजाणता या नाटकात पहिली संधी दिली. या नाटकातील त्यांच्या अभिनयामुळे त्यांना झुंज चित्रपटात नायकाची भूमिका मिळाली. त्यांचा हा पहिलाच चित्रपट आणि त्यातील त्यांची भूमिका खूप गाजली आणि मराठी चित्रपट सृष्टीला नवा सुपरस्टार लाभला. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांनी अभिनय केलेले सर्वच चित्रपट गाजले.

यात आराम हराम है!, लक्ष्मी, लक्ष्मीची पावले, देवता, गोंधळात गोंधळ, मुंबईचा फौजदार हे चित्रपट तर प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली. आजही दूरदर्शनवर हे चित्रपट लागले तर प्रेक्षक आवडीने पाहिले. या चित्रपटातील गाणीही खूप गाजली. त्यांनी अनेक नाटकातही भूमिका केल्या, बेलभांडार अपराध मीच केला या नाटकातील भूमिका खूप गाजल्या. त्यांनी काही चित्रपट आणि नाटके देखील दिग्दर्शित केली. ९० च्या दशकात काही टीव्ही वरील मालिकेतही त्यांनी भूमिका केल्या. काही मालिका दिग्दर्शित केल्या.

मधल्या काळात ब्रेक घेऊन त्यांनी काय राव तुम्ही, कॅरी ऑन मराठा, देऊळ बंद, पानिपत या चित्रपटात चरित्र नायकाच्या भूमिका केल्या . त्यांच्या अभिनय कलेसाठी त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले. त्यांच्या निधनाने मराठी चित्रपट सृष्टीने एक राजबिंडा नायक गमावला. रवींद्र महाजनी यांना भावपूर्ण आदरांजली!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# कर्करोगाविरुद्धची लढाई केवळ डॉक्टरांची नाही, संपूर्ण समाजाची!

हृदयविकारानंतर जगभरात सर्वाधिक जीव घेणारा आजार म्हणून कर्करोगाने पुन्हा एकदा धोक्याची घंटा वाजव-ली आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (थक्ज) ताज्या अहवालानुसार दरवर्षी जगभरात जवळपास एक कोटी लोकांचा कर्करोगामुळे मृत्यू होतो, तर दोन कोटींहून अधिक नवीन रुग्णांचे निदान होते. दररोज २६ हजारांहून अधिक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळतो. ही केवळ आरोग्य क्षेत्रा-तील आकडेवारी नाही; ती जगासमोरील गंभीर सामाजिक, आर्थिक आणि मानवी संकटाची नोंद आहे. अधिक चिंतेची बाब म्हणजे २०५० पर्यंत कर्करोगाच्या नवीन रुग्णसंख्येत ६७ ते ७७ टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हा इशारा दुर्लक्षित करण्याची चूक मानवजातीला परवडणारी नाही.

भारताची परिस्थितीही तितकीच गंभीर आहे. प्रत्येक नऊ भारतीयांपैकी एका व्यक्तीला आयुष्यात कधीतरी कर्करोग होण्याचा धोका आहे. चीन आणि अमेरिकेनंतर भारताचा कर्करुग्णांच्या संख्येत तिसरा क्रमांक लागतो. २०२६ मध्ये देशातील कर्करुग्णांची संख्या २० लाखांच्या घरात जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आपली लोकसंख्या मोठी असल्याने हा प्रश्न केवळ वैद्यकीय राहत नाही; तो राष्ट्रीय उत्पादकता, अर्थव्यवस्था, सामाजिक सुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा विषय बनतो. एका कुटुंबातील कमावती व्यक्तीला कर्करोग झाल्यास संपूर्ण कुटुंब आर्थिक, मानसिक आणि सामाजिक संकटात सापडते.

आजचा कर्करोग हा केवळ नशिबाचा खेळ राहिलेला नाही. त्यामागे बदलती जीवनशैली मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरत आहे. तंबाखूचे सेवन, धूम्रपान, गुटखा, मावा, मद्यपान, लठ्ठपणा, व्यायामाचा अभाव, प्रक्रिया केलेले अन्न, प्रदूषण आणि वाढता ताण या सर्वांचा थेट संबंध कर्करोगाशी जोडला जात आहे. विशेषतः फुफ्फुसाचा कर्करोग हा जगा-तील सर्वाधिक मृत्यू घडवणारा कर्करोग ठरत आहे. भारतात मुखाचा कर्करोगही मोठ्या प्रमाणात आढळतो आणि त्यामागे तंबाखूजन्य पदार्थांचे व्यसन हे प्रमुख कारण आहे. स्त्रियांमध्ये स्तनाचा आणि गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग वाढत आहे. यातील अनेक प्रकार योग्य वेळी निदान झाले तर पूर्णपणे बरे होऊ शकतात, ही वस्तुस्थिती अनेकदा दुर्लक्षित राहते.

कर्करोगाविषयीचा सर्वात मोठा गैरसमज म्हणजे तो मृत्यूचे निश्चित निमंत्रण. प्रत्यक्षात अनेक प्रकारचे कर्करोग सुरुवातीच्या टप्प्यात ओळखले गेले तर उपचार यशस्वी होण्याची शक्यता खूप जास्त असते. 'लवकर निदान म्हणजे कमी खर्च आणि अधिक आयुष्य; उशिरा निदान म्हणजे प्रचंड खर्च आणि कमी शक्यता' हे सूत्र आता प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचले पाहिजे. दुर्दैवाने भारतात प्रतिबंधात्मक तपासणीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. १००० महिलांपैकी केवळ एक महिला नियमित कर्करोग तपासणी करून घेते, ही बाब धक्कादायक आहे. मॅमोग्राफी, पॅप स्मिअर, मुख तपासणी आणि इतर स्क्रीनिंग सुविधा उपलब्ध असूनही जागरूकतेअभावी त्यांचा पुरेसा वापर होत नाही.

कर्करोग केवळ शरीरावर नाही, तर कुटुंबाच्या आर्थिक कण्यावरही घाव घालतो. सुमारे ४५ टक्के रुग्णांना उपचारासाठी गंभीर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. औषधे, शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी, तपासण्या, प्रवास आणि राहण्याचा खर्च यामुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी होतात. अत्यावश्यक कर्करोग औषधांची उप-लब्धता गरीब देशांमध्ये अजूनही अत्यल्प आहे. विमा संरक्षण सर्वांपर्यंत पोहोच-लेले नाही. वैद्यकीय विम्यावर जीएसटी हटवूनही प्रीमियम वाढल्याने सामान्य नागरिकांना अपेक्षित दिलासा मिळालेला नाही. आरोग्यसेवा ही बाजारपेठेची वस्तू न राहता मूलभूत हक्क म्हणून उपलब्ध व्हावी, अशी व्यवस्था निर्माण करणे ही सरकारची जबाबदारी आहे.

जगातील श्रीमंत आणि गरीब देशांतील कर्करोग उपचारांमध्ये मोठी दरी दिसून येते. उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये स्तनाच्या कर्करोगानंतर पाच वर्षांहून अधिक काळ जगणाऱ्या महिलांचे प्रमाण ८७ टक्के आहे, तर गरीब



देशांमध्ये ते ४२ टक्क्यांपेक्षा कमी आहे. ही तफावत केवळ वैद्यकीय नाही; ती सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. ग्रामीण भागात अद्ययावत उपचार, तज्ज्ञ डॉक्टर, तप-ासणी केंद्रे आणि आर्थिक सहाय्य यांचा अभाव अजूनही जाणव-तो. या पार्श्वभूमीवर कर्नाटकने उभारलेले कर्करोग प्रतिबंध मॉडेल आशादायी ठरते. 'आशा' स्वयंसेविका घरोघरी जाऊन ३० वर्षांवरील नागरिकांची तपासणी करतात. स्तन, गर्भाशय आणि मुखाच्या कर्करोगासाठी नियमित स्क्रीनिंग केली जाते. डिजिटल ट्रॅकिंग, प्रादेशिक कर्करोग केंद्रे आणि गरीबांसाठी मोफत उपचार यामुळे रुग्णांना वेळेत सेवा मिळते. महाराष्ट्रासह इतर राज्यांनीही अशा मॉडेलचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

कर्करोगाविरुद्धची लढाई केवळ रुग्णालयांमध्ये जिंकली जाणार नाही. त्यासाठी व्यापक सार्वजनिक धोरण आवश्यक आहे. सरकारने प्रत्येक जिल्ह्यात आधुनिक कर्करोग निदान केंद्रे उभारावीत, प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून स्क्रीनिंग कार्यक्रम राबवावेत, तंबाखूविरोधी कायद्यांची कठोर अंमलबजावणी करावी, आवश्यक औषधांच्या किमती नियंत्रित ठेवाव्यात, वैद्यकीय विमा अधिक परवडणारा करावा, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळात गुंतवणूक वाढवावी तसेच मानसिक आणि सामाजिक पुनर्वसनालाही आरोग्य व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनवावे.

सरकारची जबाबदारी जितकी महत्त्वाची आहे, तितकीच नागरिकांचीही आहे. तंबाखू आणि धूम्रपान पूर्णपणे टाळणे, संतुलित आहार घेणे, नियमित व्यायाम करणे, वजन नियंत्रणात ठेवणे, संशयास्पद लक्षणांकडे दुर्लक्ष न करणे आणि वयानुसार नियमित स्क्रीनिंग करून घेणे या सवयी हजारो जीव वाचवू शकतात. तज्ज्ञांनी मांडलेला विचार विशेष महत्त्वाचा आहे 'माझे आरोग्य ही माझी जबाबदारी आहे.' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

कर्करोगाविरुद्धची लढाई ही केवळ वैद्यकीय उपचारांची लढाई नाही; ती जागरूकता, प्रतिबंध, वेळेवर निदान, परवडणारे उपचार, संशोधन, सामाजिक सुर-क्षा आणि सामूहिक जबाबदारी यांची लढाई आहे. आज आपण योग्य दिशा निवडली तर उद्याची लाखो आयुष्ये वाचू शकतात. कर्करोगाला घाबरण्याची गरज नाही, पण त्याकडे दुर्लक्ष करण्याची चूकही परवडणारी नाही. कारण वेळेवर घेतलेली एक तपासणी, सोडलेले एक व्यसन आणि बदललेली एक जीवनशैली एखाद्या व्यक्तीचेच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाचे भविष्य बदलू शकते. जगाने दिलेला हा इशारा भारतासाठीही तितकाच महत्त्वाचा आहे. आता कृतीची वेळ आली आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि.सांगली

# मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अंतर्गत गणना फॉर्म संकलन व डिजिटायझेशनसाठी विशेष कॅम्प

## मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व पारदर्शक करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाची व्यापक मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत, सर्वसमावेशक आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाची मतदार म्हणून नोंद सुनिश्चित करणे, मृत, स्थलांतरित किंवा दुबार नोंदी अद्ययावत करणे तसेच प्रत्येक मतदाराची माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून मतदार यादीची विश्वासार्हता अधिक बळकट करणे हा आहे.



या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी संजय वारकड तसेच सहायक मतदार नोंदणी अधिकारी सानप (उपअभियंता, पाटबंधारे विभाग) यांनी गुजराती हायस्कूल, नांदेड येथे ११ बीएलओंच्या कार्यक्षेत्रातील मतदारांसाठी विशेष कॅम्पची पाहणी केली.

कॅम्पला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बीएलओंनी मतदारांकडून गणना फॉर्म भरून घेणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे आणि त्याचवेळी माहितीचे डिजिटायझेशन करण्याची प्रक्रिया प्रभावीपणे राबविली. यामुळे मतदार नोंदणीची प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि अचूक होत असल्याचे यावेळी निदर्शनास आले.

यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी उपस्थित सर्व बीएलओंना मार्गदर्शन करताना गणना फॉर्मचे शंभर टक्के वाटप, त्वरित संकलन आणि त्याच दिवशी डिजिटायझेशन करण्याच्या सूचना दिल्या. फॉर्म संकलन आणि डिजिटायझेशन यामध्ये कोणताही फरक राहता कामा नये. दोन्ही कामे समांतर आणि शंभर टक्के पूर्ण करावीत, अशा सक्त सूचना त्यांनी दिल्या.

सुपरवायझर सापटगावकर यांनी कॅम्पमध्ये उपस्थित राहून बीएलओंच्या अडचणी जाणून घेतल्या आणि त्यांचे तत्काळ निराकरण केले.

भारत निवडणूक आयोगाचे ध्येय कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये आणि कोणतीही अपात्र नोंद मतदार यादीत राहू नये हे आहे. त्याच अनुषंगाने एसआयआर कार्यक्रमाद्वारे घराघरांत जाऊन पडताळणी, अचूक माहिती संकलन, तत्काळ डिजिटायझेशन आणि पारदर्शक मतदार नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यामुळे भविष्यातील निवडणुकांसाठी अधिक विश्वासार्ह, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त मतदार यादी तयार होण्यास मोठी मदत होणार आहे.

प्रशासनाने सर्व पात्र नागरिकांना या विशेष मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून आवश्यक माहिती व कागदपत्रे बीएलओंकडे वेळेत उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले आहे.

# लोह्यात बुद्ध विहार, पोलीस ठाणे बांधकामाची आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केली पाहणी

**लोहा (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात सर्वात मोठे बुद्ध विहार लोहा शहरात साकारत असून, ही वास्तू ज्ञानकेंद्र व्हावे यासाठी खुद्द आ. प्रतापराव पाटील चिखलीकर प्रयत्नशील आहेत. तसेच पोलीस ठाण्याच्या इमारती पूर्णत्वास जाण्यासाठी व काही बदल करण्यासाठी डीवायएसपी, पोलीस निरीक्षक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली. तसेच या दोन्ही इमारतीच्या बांधकामाची आ चिखलीकर यांनीं पाहणी व उपयुक्त सूचना दिल्या.



रविवार, दि. १२ जुलै रोजी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लोहा पोलीस ठाण्याच्या इमारतीस भेट दिली. त्याच्या पहिल्या टर्ममध्ये इमारत मंजुरी मिळाली व त्यानंतर बांधकामास सुरुवात झाली, पण या इमारतीची रचना पोलीस ठाण्यासाठी अडचणीची ठरणारी आहे. त्यामुळे आ. चिखलीकर यांनी काही सूचना सांगितल्या. डीवायएसपी जुमडे, नगराध्यक्ष शरद पवार, पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव, पोलीस उपनिरीक्षक श्रीमती कांबळे, सा. बा. विभागाचे उपअभियंता पाटील, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, युवा नेते सचिन पाटील चिखलीकर, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, बालाजी खिल्लारे, भास्कर पवार, नगरसेवक अविनाश पवार, केतन खिल्लारे, गणेश बगाडे, बाळू पवार, शहाजी पवार, श्रीकांत मंजलवाड, मारुती जंगले, सचिन मुकदम, अनिल धुतमल, इमाम लदाफ, निहाल मन्सूरी, यासह पदाधिकारी उपस्थित होते

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पोलीस ठाण्यात जाऊन बांधकाम पाहणी केली. अडीअडचणी जाणून घेतल्या. डीवायएसपी जुमडे, पोलीस निरीक्षक जाधव, बांधकाम विभागाचे उपाभियंता सुमित जाधव यांनी चर्चा केली व काही सुधारणा सांगितल्या. शिवाय ठाण्यात जाऊन त्यांनी अधिकाऱ्यांना काही भौतिक सुविधा कमी आहेत काय याची माहिती जाणून घेतली व त्याची सोडवणूक करण्याचे आश्वासित केले.

आ. चिखलीकर यांच्या ड्रीम प्रजोक्तपैकी लोह्यातील बुद्ध विहार असून, जिल्ह्यातील सर्वात मोठे विहार साकारत आहे. त्याची पाहणी केली आणि नवीन काही बाबी समाविष्ट करण्याच्या सूचना दिल्या. तसेच कमान, बाथरूम बोअरवेल, गेट तसेच विहारासमोर जागा रुंद करण्यासाठी नालीवर स्लॅब टाकण्याची सूचना दिली.

# मगनपुऱ्यात 'एसआयआर' विशेष शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्रीय निवडणूक आयोगाच्या विशेष मोहिमेअंतर्गत शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'SIR' (Special Information Revision) कॅम्पला पहिल्याच दिवशी नागरिकांचा प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मगनपुरा येथील महादेव मंदिरासमोरील, मूकबधिर शाळेच्या बाजूला या दोन दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन या प्रभागाच्या नगरसेविका तथा नांदेड महापालिकेच्या महिला बालकल्याण व शिक्षण समितीच्या सभापती सदिच्छा सोनी पाटील व वैजू सोनी यांच्यावतीने करण्यात आले आहे.



दि.११ आणि १२ जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हे शिबीर घेण्यात आले. पहिल्याच दिवशी शेकडो नागरिकांनी उपस्थित राहून आपल्या मतदानाचा हक्क सुरक्षित केला. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मतदार यादीतील त्रुटी दूर करणे, दुबार (डुप्लिकेट) नावे वगळणे, मयत व्यक्तींची नावे यादीतून कमी करणे, तसेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झालेल्या मतदारांची नावे काढून मतदार यादी अद्ययावत व पारदर्शक करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

यासोबतच १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवीन व पात्र तरुण–तरुणींची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी या शिबिरामध्ये विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी आणि प्रक्रियेदरम्यान शहरातील अनेक ज्येष्ठ नेते आणि मान्यवरांनी उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन केले व शिबिराच्या नियोजनाचे कौतुक केले. यामध्ये स्थायी समितीचे सभापती वीरेंद्रसिंघ गाडीवाले, माजी सभापती तथा विद्यमान नगरसेवक किशोर स्वामी, माजी महापौर बलवंतसिंघ गाडीवाले, नगरसेविका सदिच्छा सोनी– पाटील, डॉ. मंजुषा रानवळकर, वैजू सोनी यांच्यासह प्रभागातील प्रतिष्ठित नागरिक, महिला आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिराचे यशस्वी आयोजन प्रभाग क्र. ९ च्या नगरसेविका तथा महिला बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील आणि वैजू सोनी यांच्या वतीने करण्यात आले होते. पहिल्या दिवसाचा प्रतिसाद पाहता आयोजकांनी समाधान व्यक्त केले.

# लिंबगाव पोलिसांची जुगार अड्ड्यावर कारवाई; ७ आरोपी ताब्यात, २.१२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधातील विशेष मोहिमेंतर्गत लिंबगाव पोलिसांनी सुगाव शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून सात जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, चार मोबाईल, तीन मोटारसायकली तसेच जुगाराचे साहित्य असा एकूण २ लाख १२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने १२ जुलै रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे लिंबगाव पोलिसांच्या पथकाने सुगाव शिवारातील स्वामी समर्थ मंगल कार्यालयाजवळील शेतात झाडाखाली सुरू असलेल्या अंदर–बाहेर या जुगारावर छापा टाकला. कारवाईदरम्यान सात आरोपींना रंगेहात पकडण्यात आले.



या कारवाईत आरोपींकडून ९ हजार २०० रोख रक्कम, चार अँड्रॉइड मोबाईल, तीन मोटारसायकली आणि जुगारासाठी वापरण्यात येणारे पत्ते व इतर साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी लिंबगाव पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पंढरीनाथ बोधनकर करत आहेत.

# मनपा सुरक्षा रक्षकांना मूलभूत साहित्य देण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिका अंतर्गत गेल्या १५ वर्षांपासून सेवा बजावणाऱ्या सुरक्षा रक्षकांच्या प्रश्नांनी पुन्हा एकदा उग्र स्वरूप धारण केले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने कुटुंबाच्या उपासमारीची वेळ आली आहे. तसेच पावसाळ्यात आवश्यक असणारे रेनकोट आणि रात्रीच्या ड्युटीसाठी बॅटरी न मिळाल्याने कामात अडचणी येत असल्याचे कामगार संघटनेचे अध्यक्ष सय्यद खाजा सय्यद यांनी सांगितले. तसेच महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात मनपाच्या विविध विभागांमध्ये तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकांचे गेल्या ३ महिन्यांचे वेतन तातडीने अदा करावे. वेतनाअभावी अनेकांच्या घरात अन्नधान्याची वाण पडली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक सुरक्षा रक्षकाला दर्जेदार रेनकोट उपलब्ध करून द्यावेत. रात्रीच्या ड्युटीसाठी गस्त घालणाऱ्या रक्षकांना चार्ज करता येणाऱ्या बॅटरी आणि टॉर्च देण्यात याव्यात. इतर मूलभूत सुविधाड्युटी दरम्यान आवश्यक असणारे इतर साहित्यही त्वरित उपलब्ध करून द्यावे.

याबाबत बोलताना संघटनेचे विभागीय अध्यक्ष सय्यद खाजामिया म्हणाले की, प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन प्रश्न मार्गी लावावेत व सुरक्षा रक्षकांना न्याय द्यावा, असे आवाहन केले.

# रोटरी क्लब नांदेड आणि रोटरी क्लब नंदीग्रामच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** रोटरी क्लब नांदेड व रोटरी क्लब नंदीग्राम वर्ष २०२६–२७ या वर्षाच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा आणि संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा रविवार, १२ जुलै रोजी दुपारी १ वाजता मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी सर्वप्रथम प्रमुख पाहूणे प्रांतपाल रो. क्षितीज झावरे, सहप्रांतपाल रो. संजय पाटील, रो. शिवशंकर पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या कार्याक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा आणि विविध जिल्ह्यांतून आलेल्या रोटरी क्लबच्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर वर्ष २०२६–२७ या वर्षाच्या रोटरी क्लब नांदेडच्या नूतन अध्यक्षपदी रो. सुरेश अंबुलगेकर यांची तर सचिवपदी रो. प्रशांत गुर्जर यांची निवड करण्यात आली.



तर रोटरी क्लब नंदीग्रामच्या नूतन अध्यक्षपदी रो. डॉ. सुरभी राठोर यांची तर सचिवपदी रो. सुनंदा देवणे यांची निवड करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ नांदेडचे मावळते अध्यक्ष रो. सीए मितेश मालीवाल यांनी नूतन अध्यक्ष रो. सुरेश अंबुलगेकर आणि सचिव रो. प्रशांत गुर्जर यांच्याकडे पदभार सोपवला. तर रोटरी क्लब नंदीग्रामच्या मावळत्या अध्यक्षा स्मिता गंदेवार आणि सचिव रो. डॉ. रामचंद्र हेंडगे यांनी नूतन अध्यक्ष आणि सचिवाकडे रोटरी क्लब नंदीग्रामचा पदभार सोपवला.

रोटरी क्लब दरवर्षी वेगवेगळे उपक्रम राबवते. त्याचबरोबर सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची नेहमी काळजी घेते. विविध प्रकारचे आरोग्य शिबीर राबवून नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी केली जाते.

यावेळी रोटरी क्लब नांदेडच्या सदस्यांची रो. डॉ. संदीप पतंगे यांनी तपासणी केली. महात्मा फुले हायस्कूल नाईक नगर आणि नारायणराव भालेराव हायस्कूल स्नेहनगर या शाळांना डिजिटल क्लास रूमसाठी एलसीडी टिव्ही देण्यात आला. तसेच गरजू विद्यार्थ्यांना यावेळी शालेय साहित्यांचे देखील वाटप करण्यात आले. तसेच यावर्षी रोटरी क्लब नांदेडचे काही नव्याने सदस्य झालेल्या सदस्यांचे स्वागत करण्यात आले.त्यानंतर नूतन अध्यक्ष सुरेशराव अंबुलगेकर यांनी रोटरी क्लब नांदेडच्या माध्यमातून वर्षाभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली तसेच तीन नविन रोटरी क्लब करण्याचे सांगितले. रोटरी क्लबच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी औजारे बँक तयार करून शेतकऱ्यांना औजारे उपलब्ध करून देण्यात यावी अशी विनंती देखील केली. तसेच हॅप्पी स्कूल प्रोजक्ट, सरकारी शाळेत स्वच्छता गृह, शाळेत स्वच्छता मोहीम राबविणे, विद्यार्थ्यांना कंम्पोस खत निर्मिती करण्याची माहिती दिली जाणार, युव्हमन मिलिकच प्राजेक्ट, रोटरी आशा कॅन्सर व्हॅन सुरू करणार, डोळ्यांची तपासणी करून चश्मे वाटप करणे, अपंग व्यक्तींना कृत्रीम हात पाय वाटप करण्याचे काम हाती घेण्यात आले.

पान १ वरून...

**वजिराबाद पोलीस ठाण्याच्या...**

रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. विशेष म्हणजे मयत आणि आरोपी दोघेही बाहेरील राज्यातील असून त्यांच्याकडे कोणताही ओळखपत्राचा पुरावा नाही. पोलिसांनी महावीरसिंग संधू याला अटक करून त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

दुसरी घटना मध्यवर्ती बसस्थानक परिसरात घडली. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले शुभम उर्फ दांड्या साहेबराव इंगोले वय ३० आणि खुनाच्या गुन्ह्यात नुकताच जामिनावर सुटलेला अविनाश उर्फ बाटल्या साहेबराव इंगोले वय ३२, दोघेही राहणार गंगाचाळ, हे पाकीटमारीच्या उद्देशाने बसस्थानकात आले होते. त्याचवेळी सागर केळकर वय १७, त्याचा मावस भाऊ आणि एक मित्र दुसऱ्या बाजूला बसले होते. सागर बसस्थानकात गेल्यानंतर शुभम आणि अविनाश यांनी त्याचा पाठलाग केला. रात्री साडे आठच्या सुमारास बसस्थानकाशेजारील एका पानटपरीच्या मागील अंधाऱ्या ठिकाणी त्यांनी सागरवर चाकूने वार केले. यात सागरचा जागीच मृत्यू झाला. ही माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शहर रामेश्वर वेंजने यांनी वरिष्ठांना माहिती देऊन पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्यासह घटनास्थळी धाव घेतली. काही तासांतच शुभम आणि अविनाश या दोन्ही भावांना अटक करण्यात आली. सागरची आई संगीता केळकर यांच्या फिर्यादीवरून त्यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही घटनास्थळांना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट दिली. फॉरेन्सिक लॅबने घटनास्थळावरील रक्ताचे नमुने आणि इतर साहित्य तपासणीसाठी ताब्यात घेतले आहे. एकाच रात्री दोन खून झाल्याने नांदेड शहरात खळबळ उडाली आहे.

# जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती समितीसाठी ३० जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन –शिवानंद मिनगिरे

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय समाजात रुजलेल्या काही अनिष्ट, अघोरी, अमानुष संस्कारातून रुजलेल्या अनेक प्रकारच्या गैरसमजुतीमुळे समाजाचे अतोनात नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे. लाखो जणांचे जीव वाचविण्यासाठी त्यांचे होणारे शोषण, छळ थांबविण्यासाठी व समाजाचे मानसिक स्वास्थ सुधारण्यासाठी शासनाने जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमजबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

या समितीमध्ये अशासकीय ७ सदस्य (त्यात किमान २ महिला) व जिल्हा समन्वयक यांची नियुक्ती राज्यस्तरीय पीआयएमसी अध्यक्ष व सह अध्यक्ष यांच्या मान्यतेने व आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या सहमतीने करण्यात यावी, असे निर्देश आहेत.

तरी इच्छुक नागरिकांकडून एकूण ७ अशासकीय सदस्यांकरिता व १ जिल्हा समन्वयक यांच्याकरिता अर्ज मागविण्यात येत असून, सहायक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड या कार्यालयात शासकीय कामकाज वेळेत आपला अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम घेतलेला किमान १० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. पुरावे जोडण्यात यावे (पेपर कात्रणे व फोटो), जाहीर प्रगटन दिलेल्या तारखेपासून ६ महिन्याच्या कालावधीतील पोलीस चारित्र्य दाखला आवश्यक आहे.

स्वत:च्या गावच्या ग्रामपंचायत व पोलीस पाटील यांच्याकडील चारित्र्य दाखला, शैक्षणिक अर्हता किमान १० वी उत्तीर्ण, आपल्या मतदार संघातील लोकप्रतिनिधी यांचे शिफारस पत्र, अर्जदार महाराष्ट्र राज्यामधील नांदेड जिल्ह्यातील रहिवासी प्रमाणपत्र, २ पासपोर्ट साईजच फोटो अर्जासोबत जोडावे, स्वत:चा परिपूर्ण घरचा पत्ता व संपर्क क्रमांक अर्जात नमूद करावे. सहायक आयुक्त, समाज कल्याण नांदेड यांचे नांवे अर्ज सादर करावे. सदरचे ऑफलाईन अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण नांदेड यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच आपण अर्ज अशासकीय सदस्यासाठी अर्ज दाखल करीत आहोत की, जिल्हा समन्वयक करिता याचा स्पष्ट उल्लेख अर्जात करणे आवश्यक आहे. अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ३० जुलै २०२६ आहे. जर आवश्यकतेपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास अर्ज स्वीकारण्याची मुदतवाढ करण्यात येईल, असे समाज कल्याण कार्यालयाने कळविले आहे.

# पुण्यस्मरणातून मराठवाडा मुक्ती संग्रामाचा जागर

## ‘बापू जीवन परिचय’ पुस्तकाचे वाटप
## थोर स्वातंत्र्य सेनानी साहेबराव बापूंना अभिवादन

**मुदखेड (प्रतिनिधी)–** थोर स्वातंत्र्य सेनानी तथा लोकनायक माजी आमदार साहेबराव सखोजीराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुण्यस्मरणातून मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्याचा जागर करण्यात आला. यावेळी हजारो चाहत्यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. बापूंच्या स्मृतिदिनाला उजाळा देत असताना योगदान, समाजसेवेची निष्ठा, लोकहितासाठी केलेले कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देदीप्यमान इतिहासातून ‘बापू जीवन परिचय’ पुस्तकाचे वाटप करण्यात आले आहे.



बारड (ता. मुदखेड) येथील ग्रामस्थांच्या वतीने थोर स्वातंत्र्य सेनानी लोकनायक साहेबराव देशमुख बारडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार, दि. ११ जुलै रोजी स्वातंत्र्य सैनिक स्मारकात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अर्धाकृती पुतळ्याचे पूजन पंचायत समितीचे माजी उपसभापती सुनील देशमुख, ॲड. संदीप देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने कृतज्ञपूर्वक सामूहिक मानवंदना देण्यात आली. काँग्रेस कमिटीचे जिल्हा कार्याध्यक्ष तिरुपती कोंढेकर, जिल्हा बँकेचे माजी संचालक गोविंदराव शिंदे नागेलीकर, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास दाड, माजी उपसरपंच बाळासाहेब देशमुख, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजय देशमुख, माजी नगरसेवक कैलास गोडसे, उबाठा शिवसेना जिल्हा उपप्रमुख माणिक लोमटे, भाजपा सल्लागार उत्तमराव लोमटे, माजी सरपंच दिलीप कोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील योगदान अलौकिक होते. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी लोकनायक म्हणून घेतलेली भूमिका सर्वांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी असून, नव्या पिढीने बापूंचे स्मरण करीत त्यांच्या त्यागाचा, निष्ठेचा, लोकसेवेच्या मार्गावर चालण्याचा उपस्थितांनी यावेळी निर्धार केला.

याप्रसंगी एकनाथ शिंदे लिखित ‘बापू जीवन परिचय’ पुस्तकाचे ग्रामस्थांना वाटप करण्यात आले. या पुस्तकात बापूंच्या जीवनातील खडतर संघर्ष, स्वातंत्र्य चळवळीतील सक्रिय सहभाग, २५ वर्षे आमदार म्हणून केलेली लोकहिताचे कार्य, सामाजिक बांधिलकी यांचा वेध घेण्यात आला आहे. पुस्तक केवळ एक व्यक्तीचा इतिहास नसून संपूर्ण कालखंडाचा, त्यागाचा दस्तऐवज ठरणारा आहे. यावेळी विश्वनाथ पवार निवघेकर, सरपंच ज्ञानेश्वर गावंडेवाड, महेश देशमुख, प्रा. संदीप देशमुख, गणपत शिंदे नागेलीकर, राजेश पवार, श्रीनिवास महाद्वाड, किशोर देशमुख, के. डी. देशमुख, गजानन देशमुख, बाळासाहेब आंबेगावकर, नामदेव बिचेवार, नागोराव भांगे, बालाजी शिंदे, संजय बोकेफोड, दिगंबर टिपरसे नारायणराव देशमुख, मोहम्मद गौस, सुरेश गोवंदे, गणेशराव सूर्यतळे, आकाश सोनटक्के, आनंदा पवार, अमोल लोमटे, किशोर पिल्लेवाड, भगवान पवार निवघेकर, शरद कवळे, गजानन कत्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवार

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

जुलैच्या पहिल्या आठवड्यानंतर पावसाने आता मोठा खंड दिला आहे. मान्सून सुरू झाल्यानंतरही महाराष्ट्रात अपेक्षित पाऊस नाही. जी पेरणी झाली, त्या पिकांची स्थिती यामुळे बिकट होऊ शकते. पिके वाया जाण्याची भीतीही आहे. अशा स्थितीत काय उपाययोजना कराव्यात, याबद्दल...

# पावसाच्या खंड काळात घ्यावयाची काळजी..!

**पिकांची उगवण झाल्यावर सर्वसाधारण १५ ते २० दिवसांनंतर पिकांमध्ये ४ ते ६ ओळींनंतर बळीराम नांगर अथवा कोळप्याच्या मदतीने सऱ्या काढाव्यात. यामुळे सुरुवातीस पडलेला पाऊस सऱ्यांमध्ये साठविला जाऊन पाण्याची उपलब्धता वाढते. उत्पादनात १५-२० टक्के वाढ होते. बऱ्याचवेळा सरासरी एवढा पाऊस झाला तरी नेमका पीकवाढीच्या संवेदनशील अवस्थेत पावसाचे १ ते २ खंड आढळून येतात. हे पावसाचे खंड बऱ्याचवेळा जुलै, ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात आढळतात. हा पावसाचा अनियमितपणा किंवा खंड पिकांच्या सुरुवातीच्या अवस्थेत, पिकांच्या मध्यावस्थेत आणि पक्वतेच्या काळातसुद्धा येऊ शकतो आणि त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.**



सर्वसाधारणपणे पाऊस नेहमीपेक्षा उशिरा सुरू होणे, पाऊस नेहमीपेक्षा लवकर बंद होणे, पाऊस वेळेवर सुरू होणे व मध्येच मोठा खंड पडणे आणि अतिवृष्टी होणे अशाप्रकारे कोणतीही एक आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ शकते. सध्या मराठवाडा विभागात अनेक ठिकाणी पावसाचा खंड आढळून येत आहे. काही ठिकाणी वेळेवर पेरणी झाली. त्याठिकाणी पिकांची वाढ समाधानकारक आहे. परंतु, पावसाच्या खंडामुळे पिकांचे व्यवस्थापन योग्य रितीने करणे आवश्यक आहे. काही ठिकाणी उशिरा पेरणी झाली आहे, तेथे पिकांसाठी पावसाचा खंड काळात योग्य उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे.

## पाणी व्यवस्थापन

या काळात विहीर किंवा शेततळ्यात पाणी असल्यास पिकांच्या संवेदनशील अवस्थेत संरक्षित पाणी सिंचन (तुषार किंवा ठिबक सिंचन) द्वारे द्यावे. खरिपातील पिकांची उगवण झाल्यावर सर्वसाधारण १५ ते २० दिवसांनंतर पिकांमध्ये ४ ते ६ ओळींनंतर बळीराम नांगर अथवा कोळप्याच्या मदतीने सऱ्या काढाव्यात. यामुळे सुरुवातीस पडलेला पाऊस सऱ्यांमध्ये साठविला जाऊन पाण्याची उपलब्धता वाढते. उत्पादनात १५-२० टक्के वाढ होते. उशिरा झालेला पाऊस सऱ्यांमध्ये मुरविला जातो, जो पुढे रब्बी पिकांना लाभदायक ठरतो. पावसाचा खंड काळात पिकांच्या अवस्थेनुसार हलक्या कोळपण्या कराव्यात, पिकांना मातीची भर द्यावी, भेगा बुजविल्या जातात. याद्वारे ओलावा साठवून ठेवण्यात मदत होते.

## तण व्यवस्थापन

तणे ही अन्नद्रव्ये व जमिनीतील ओलावा यासाठी पिकांसोबत स्पर्धा करतात. तणांना पिकापेक्षा दोन ते तीन पट अधिक प्रमाणात पाणी लागते. पावसाच्या ताणाच्या काळात पिकांतील तणांचे योग्य वेळी नियंत्रण करावा. कोळप्याने वरचेवर उथळ मशागत (हलकी कोळपणी) करावी. यामुळे पिकाबरोबर तणांची स्पर्धा कमी होऊन जमिनीतील ओलावा जास्त काळ टिकेल. झाडा भोवती हलकीशी चाळणी करावी. तण काढून घ्यावे व झाडाभोवती मातीचे आच्छादन करावे. त्यामुळे जमीन भुसभुसीत होण्यास मदत होते. भेगा बुजविल्या जाऊन बाष्पीभवनाद्वारे पाणी जे वाया जाते ते वाचविले जाते. यामुळे १० ते १५ मि. मी. ओलाव्याची बचत होते. गरजेनुसार निंदणी व कोळपणी करून तणांचे नियंत्रण करावे. तसेच परिस्थितीनुसार तणनाशकांचा वापर करावा.

# कसे कराल आपत्कालिन पीक नियोजन?

**जुलै महिन्यात सूर्यफुलाची पेरणी शक्य झाली नसल्यास ऑगस्ट महिन्याअखेर आपत्कालिन परिस्थितीत या पिकाची पेरणी फायदेशीर ठरू शकते. सूर्यफुलाचे संकरित वाण पीकेव्हीएसएच - २७, पीकेव्हीएसएफ - ९, संकरित केबीएसएच - १, पीएएस - ८२ तसेच बाजारात उपलब्ध असलेल्या इतर दर्जेदार वाणांची निवड करावी. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरम किंवा २ ग्रॅम कार्बेन्डाझिम अधिक पेरणीच्या वेळी शेतातच ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा या बुरशीनाशकाची प्रक्रिया करावी. सूर्यफुलाची पेरणी सरत्याने किंवा टोकून दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी किंवा ६० सेंमी व झाडातील अंतर ३० सेंटिमीटर ठेवून करावी. शिफारस केलेल्या खत मात्रेपैकी अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद पेरणीच्या वेळी देऊन उरलेल्या नत्राची मात्रा पेरणीपासून ३० ते ३५ दिवसांनी द्यावी.**

- जुलै -ऑगस्ट महिन्यात अर्ध रब्बी तुरीची लागवड करणे हा सुद्धा एक पर्याय फायदेशीर आहे. अर्ध रब्बी तुरीची लागवड करायची झाल्यास मध्यम ते उशिरा कालावधीचे वाण उदा. एकेटी ८८११, पीकेव्ही तारा, सी ११, आयसीपीएल ८७११९ वापरावे. या वाणांचे प्रति हेक्टरी २५ ते ३० किलो बियाणे घेऊन ४५ बाय २० सेंमी अंतरावर पेरणी करावी. जसजसा पेरणीला उशीर होईल त्या प्रमाणात दोन ओळीतील व दोन झाडांतील अंतर कमी करावे. कारण उशिरा पेरणी केली असता वाढ कमी होते.
- अर्ध रब्बी तिळाची लागवड १ ते १५ सप्टेंबरपर्यंत करावी. एन - ८ या जातीचे हेक्टरी दोन किलो बियाणे तिफणीने ३० सेंमी अंतरावर पेरावे. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम, कॅप्टन पैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची चार ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. पेरणी सोबत ३० किलो युरिया व १५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट ही रासायनिक खते द्यावीत.
- एरंडी या पिकाची सुद्धा अर्ध रब्बी हंगामात ऑगस्ट महिन्याअखेर तसेच सप्टेंबरच्या सुरुवातीला पेरणी करावी. लगेच एरंडी + तूर १:१ ही आंतरपीकपद्धती अधिक फायदेशीर ठरू शकते.



# अतिवृष्टिबाधित ऊस पिकात कोणत्या उपाययोजना कराल?

**एकीकडे ६० टक्के महाराष्ट्र अपेक्षित पाऊस नसल्याने चिंताग्रस्त असला तरी कोकण, दक्षिण महाराष्ट्रात पावसाचे चित्र गेल्या काही दिवसांत समाधानकारक किंवा अतिपाऊस असे राहिले आहे. अशा अतिवृष्टिबाधित क्षेत्रात ऊस पिकात कोणत्या उपाययोजना कराव्यात, याबद्दल...**



महाराष्ट्रात वेगवेगळ्या हंगामात दरवर्षी साधारणतः ८ ते १० लाख हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवड केली जाते. मागील ३ ते ४ वर्षांत, वातावरणात होणाऱ्या अचानक बदलांचा परिणाम विविध पिकांसह ऊस लागवडीवर देखील दिसून येतो आहे. मागील काही वर्षांत जुलै-ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे प्रमुख ऊस उत्पादक जिल्ह्यांतील उसाखालील शेती पाण्याखाली गेल्याचे चित्र पाहायला मिळते आहे. त्यामुळे ऊस पिकामध्ये विविध समस्या निर्माण होऊन मोठे नुकसान होते. अशा स्थितीमध्ये पूरग्रस्त भागातील ऊस पिकामध्ये संभाव्य उपाययोजना करून नुकसान टाळता येईल.

## संभाव्य नुकसान...

- जमिनीतील ऑक्सिजनची पातळी खालावते. त्यामुळे अन्नद्रव्यांची उपलब्धता कमी होऊन पाने पिवळी पडतात व वाढ खुंटते.
- मुळांची कार्यक्षमता घटल्याने पाणी व अन्नद्रव्यांचे शोषण योग्यप्रकारे होत नाही. तसेच बाष्पीभवन व कर्बग्रहण क्रिया मंदावते.
- पूर्ण पाण्यात बुडालेल्या उसाच्या शेंड्यात माती व पाण्याचा शिरकाव झाल्याने कोंब कुजतो व पांगश्या फुटतात.
- एका आठवड्यापेक्षा जास्त काळ ऊस पीक पाण्यात राहिल्यास पाने वाळतात. ऊस कुजू लागतो.
- नवीन लागवडीत ७ दिवसांपेक्षा जास्त काळ पाणी राहिल्यास, बहुसंख्य डोळे कुजतात. परिणामी उगवण कमी होते.
- पूरग्रस्त क्षेत्रात प्रवाही पाण्याच्या भागात ऊस लोळण्याचे प्रमाण वाढते.
- पूरग्रस्त उसामध्ये कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढलेला दिसून येतो.



## करावयाच्या उपाययोजना

**ऊस पीक ८ ते १० दिवसांपेक्षा जास्त काळ पाण्याखाली बुडून कुजलेल्या शेतामध्ये वापसा आल्यानंतर ऊस काढून टाकावा. त्याचा उपयोग कंपोस्ट निर्मितीसाठी करता येतो. त्यानंतर जमिनीची नांगरट करून फेरपालटीची पीक म्हणून ताग, धैंचा अशा हिरवळीच्या पिकांची लागवड करावी. तसेच गहू, हरभरा, मका इत्यादी पिके घ्यावीत. त्यानंतर ऊस लागवड करावी.**

- शेतातील पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या बाजूने चर काढावेत. किंवा पंपाच्या साह्याने पाणी शेताबाहेर काढावे. उसाची वाळलेली व कुजलेली पाने काढून टाकावीत. जेणेकरून हवा खेळती राहण्यास मदत होईल.
- ज्या ठिकाणी ऊस अंशतः वाळलेला आहे अशा पिकाचा खोडवा घ्यावा. त्यासाठी जमिनीलगत छाटणी करावी. खोडवा मशागतीची कामे, कीटकनाशक व बुरशीनाशकांची फवारणी तसेच खतांचा संतुलित वापर करून त्वरित हलकी भरणी करावी. एक महिन्यात तुटाळ भरावी.
- पूरग्रस्त शेतातील उसाची वाढ पुन्हा चांगल्याप्रकारे होण्यासाठी हेक्टरी नत्र ६० किलो (युरिया १३० किलो), पालाश ४० किलो (म्युरेट ऑफ पोटॅश ६६ किलो) आणि व्हीएसआय निर्मित मायक्रोसोल १२.५ किलो प्रमाणे वापर करावा.
- डीएपी (२ टक्के) २० ग्रॅम अधिक युरिया (१ टक्का) १० ग्रॅम अधिक पालाश (०.५ टक्का) ५ ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी वापर करावा. त्यामुळे पिकाच्या वाढीवर चांगला परिणाम दिसून येतो. नत्र स्थिर करणाऱ्या व स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणूंचा हेक्टरी २.५ लिटर या प्रमाणात वापर करावा.
- पानांवरील तांबेरा, पोक्का बोंग व तपकिरी ठिपके या रोगांच्या नियंत्रणाकरिता, मॅन्कोझेब (०.३ टक्का) ३ ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. कांडी कीड नियंत्रणासाठी, हेक्टरी १५ ट्रायकोकार्ड पानांवर टोचावेत. किंवा क्लोरॲन्ट्रानिलीप्रोल ३.७५ मिलि प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.
- गोगलगायींचा प्रादुर्भाव आढळल्यास, संध्याकाळच्या वेळी उसाच्या हिरव्या पानांचे किंवा ओल्या बारदानाचे ढीग करून शेतात ठेवावेत. दुसऱ्या दिवशी बारदानावर गोळा झालेल्या गोगलगायी नष्ट कराव्यात. गोगलगायग्रस्त शेतात मेटाल्डिहाइड (२.५ टक्के) युक्त आमिषाचा ५ किलो प्रति हेक्टरी प्रमाणे वापर करावा. पुराचे पाणी ओसरल्यानंतर कुजलेला ऊस शेतातून काढून हुमणी प्रादुर्भावग्रस्त शेतात उभी व आडवी नांगरट करावी.

# ओलावा टिकविण्यासाठी कोळपणी महत्त्वाची...

**जमिनीत साठवून राहिलेली ओल पिकांनी वापरणे, पृष्ठभागावरून बाष्पीभवनामुळे ओल उडून जाणे, भेगा पडल्यामुळे त्यातून बाष्पीभवन होणे, तणावाटे ओल नष्ट होणे या चार मार्गाने ओल कमी होते. त्यातील पिकाच्या प्रत्यक्ष वाढीसाठी अतिशय कमी प्रमाणात ओल लागते. बहुतांशी (सुमारे ६० टक्के) ओल ही बाष्पीभवनामुळे उडून जाते. यासाठी पिकामध्ये कोळपणी करणे फायद्याचे ठरते.**

पीक वाढताना त्याबरोबर तण वाढत असते. हे तण पाणी अन्नद्रव्ये आणि सूर्यप्रकाश याबाबतीत पिकांशी स्पर्धा करते. पीक उगवून आल्यावर त्यात ठराविक दिवसानंतर कोळपणी केली जाते. त्याचा मुख्य उद्देश तण नष्ट करणे आणि वाया जाणारी ओल थांबविणे. तणामुळे कमी होणारी ओल, तणांचा बंदोबस्त केल्याने राखली जाते. याशिवाय माती हलवून मोकळी केल्याने जमिनीच्या पृष्ठभागावर एक पोकळ थर तयार होतो. त्यामुळे उडून जाणारी ओल थोपवता येते. यामुळे ओल टिकवून धरण्यामध्ये कोळपणीचा फार मोठा वाटा आहे. एकदा कोळपणी केली तर पाणी दिल्याप्रमाणे फायदा होतो. या तत्त्वांचा अवलंब करून कोरडवाहू शेती तंत्रामध्ये रब्बी ज्वारी करिता तीन वेळेस कोळपणी करण्याची शिफारस केली आहे. पहिली कोळपणी पीक तीन आठवड्याचे झाले असता फटीच्या कोळप्याने करावी. त्यामुळे वाढणारे तण नष्ट करून त्यावाटे होणारा पाण्याचा अपव्यय टाळता येतो. दुसरी कोळपणी पीक पाच आठवड्याचे झाल्यावर पासेच्या कोळप्याने करावी. त्यावेळेस जमिनीतील ओल कमी झाल्याने जमिनीला सूक्ष्म भेगा पडू लागलेल्या असतात, त्या कोळपणीमुळे बंद होतात. त्यामुळे बाष्पीभवनाची क्रिया मंद होते. तिसरी कोळपणी पीक आठ आठवड्याचे झाले असताना करावी. त्यावेळी कोळपणी करण्यासाठी दातेरी कोळपे वापरण्याची शिफारस आहे. जमीन टणक झाल्याने फासाचे कोळपे नीट चालत नाही.त्याकरिता दातेरी कोळपे वापरले असता ते मातीत व्यवस्थित घुसून माती मोकळी करते, त्यामुळे भेगा बुजविल्या जातात. ज्यावेळी जमिनीत ओल फार कमी असेल त्यावेळी आणखी एखादी कोळपणी केल्यास लाभदायी होते.

## ज्वारीमधील कोळपणी...

कोरडवाहू रब्बी ज्वारी तयार होण्यास साधारणपणे १८० पासून २८० मिमी ओल लागते. त्यापैकी ४० टक्के ओल पीक फुलोऱ्यात येण्यापासून तयार होण्याच्या अवस्थेत लागते म्हणून प्रयत्न पूर्वक ओल साठविण्याचे उपाय करावे. आंतरमशागतीकरिता खुरपणी देखील अपेक्षित आहे.परंतु सुरवातीस ज्यावेळी जमीन मऊ आहे आणि तण वाढत आहे,त्यावेळी या खुरपणीचा लाभ होतो. परंतु बैल कोळपे चालविल्याने खोलवर मशागत करता येते. जमीन भुसभुशीत होऊन मातीचा थर चांगला बसू शकतो. मर्यादेपेक्षा जादा असलेली रोपे काढून टाकणे हा पण एक ओलावा टिकविण्याचा उपाय आहे.

| | | |
|---|---|---|
| पहिली कोळपणी | तिसऱ्या आठवड्यात | फटीचे कोळपे |
| दुसरी कोळपणी | पाचव्या आठवड्यात | पासेचे कोळपे |
| तिसरी कोळपणी | आठव्या आठवड्यात | दातेरी कोळपे |

### रब्बी ज्वारीस पाणी देण्याच्या अवस्था

- ज्वारी पिकाचा जोमदार वाढीचा काळ : पेरणीनंतर २८ ते ३० दिवसांनी
- पीक पोटरीत असताना : पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी
- पीक फुलोऱ्यात असताना : पेरणीनंतर ७० ते ७५ दिवसांनी
- कणसात दाणे भरण्याचा काळ : पेरणीनंतर ९० ते ९५ दिवसांनी



### पाणी व्यवस्थापन

ज्वारी हे कोरडवाहू पीक म्हणून ओळखले जाते. या पिकास तयार होण्यासाठी ११० ते १२० दिवस लागत असल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज असते. बागायती ज्वारीस दिलेल्या पाण्यापैकी ७० टक्के पाणी पहिल्या ३० सेंमी जमिनीच्या थरातून,१६ टक्के पाणी दुसऱ्या थरातून,९ टक्के पाणी तिसऱ्या थरातून तर उरलेले ५ टक्के पाणी चौथ्या थरातून पीक घेत असते. पहिल्या ३० सेंमी थरात ६० टक्यांपेक्षा जास्त मुळे असल्याने या थरातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज भागवली जाते. बागायती ज्वारीस पीक वाढीच्या महत्त्वाच्या चार अवस्थेत पाणी देणे फायदेशीर ठरते.मात्र भारी,काळ्या खोल जमिनीत पहिल्या तीन अवस्थेतच पाणी द्यावे.

- कोरडवाहू ज्वारीस संरक्षित पाण्याची सोय असल्यास पीक गर्भावस्थेत असताना पेरणीनंतर २८ ते ३० दिवसांनी किंवा पीक पोटरीत असताना ५० ते ५५ दिवसांनी द्यावे.
- दोन पाणी देणे शक्य असल्यास वरील दोन्ही नाजूक अवस्थेत ज्वारीला पाणी द्यावे.
- बागायती ज्वारीस मध्यम जमिनीत तिसरे पाणी फुलोऱ्यात असताना पेरणीनंतर ७० ते ७५ दिवसांनी आणि कणसात दाणे भरताना ९० ते ९५ दिवसांनी द्यावे.
- भारी जमिनीत ज्वारीला चौथ्या पाण्याची गरज भासत नाही.

# कोणत्या कारणांमुळे दूध नासतं?

**लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांच्याच आहारातील महत्त्वाचा भाग म्हणजे दूध. दुधातील अनेक शक्तिवर्धक घटकांच्या योग्य प्रमाणामुळे, दुधाला आपण पूर्णान्न म्हणतो. दूध पूर्णान्न असले तरी, सध्या दुधाची खालावलेली गुणवत्ता ही मोठी समस्या बनली आहे.**

दूध नाशवंत असल्यानं, त्याची योग्य काळजी न घेतल्यास ते लवकर खराब होऊन जाते. दूध खराब होण्याची इतरही बरीच कारणे आहेत. जनावरांची धार काढल्यापासून ते ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास जास्त वेळ लागणे. दुधाची भांडी स्वच्छ नसणे. धार काढणारी व्यक्ती स्वच्छ नसणे, धार काढताना हात धुतलेले नसणे. धार काढणाऱ्या व्यक्तीला संसर्गजन्य रोगाची बाधा असल्यास. जनावरांची कास धुण्यासाठी अस्वच्छ पाण्याचा वापर केल्यास. दुधाची वाहतूक भर उन्हात करणे. दुधाची वाहतूक करताना कोल्ड चेनचा वापर न करणे. आजारी किंवा उपचार सुरू असलेल्या जनावरांचे दूध निरोगी जनावरांच्या दुधात मिसळणे. शिळे आणि ताजे दूध एकत्र केल्यास. जनावरांचा गोठा अस्वच्छ असल्यास विशेषतः धार काढण्याची जागा ओलसर असल्यास... अशा अनेक विविध कारणांमुळे दूध खराब होऊन फाटते. असे दूध वापरास अयोग्य असते. दूध नासल्याने बऱ्याच वेळेस ग्राहकांसोबत, विक्रेत्यांचे नुकसान होते.

# लाडकी बहीण योजनेतून ९२ लाख महिलांची नावे वगळली



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'तून एक अत्यंत मोठी माहिती समोर येत आहे. ताज्या आकडेवारीनुसार, या योजनेतून आतापर्यंत तब्बल ९२ लाख महिलांची नावे वगळण्यात आली आहेत. केवळ एक महिन्यापूर्वी सरकारने ८० लाख लाभार्थी कमी झाल्याचे सांगितले होते, मात्र आता हा आकडा थेट ९२ लाखांवर पोहोचला आहे. मूळ २.४ कोटी लाभार्थ्यांच्या तुलनेत ही घट तब्बल ३८ टक्के एवढी मोठी आहे.

केवळ तांत्रिक अडचणींमुळे नव्हे, तर ई-केवायसी न करणे, उत्पन्नाची मर्यादा ओलांडणे आणि वयाचे निकष न बसणे यांसारख्या विविध कारणांमुळे ही मोठी कपात करण्यात आली आहे. याशिवाय सुमारे १४ हजार पुरुषांनी या योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला होता, त्यामुळे त्यांनाही या योजनेतून वगळण्यात आले आहे.

ताज्या आकडेवारीनुसार, निकषांमध्ये न बसणाऱ्या आणि आवश्यक प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या अपात्र लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने बाहेर काढण्यात आले आहे. ई-केवायसी अपूर्ण: सरकारने ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुमारे आठ महिन्यांचा अवधी दिला होता. मात्र, मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न करू शकल्याने ५० ते ५५ लाख महिला यादीतून बाद झाल्या. वार्षिक उत्पन्न मर्यादा: योजनेच्या नियमापेक्षा जास्त वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या १२ लाख महिलांचे अर्ज फेटाळण्यात आले. तपासणीत १२ लाख महिला या प्राप्तीकर भरणाऱ्या असल्याचे आढळून आले, ज्यांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे.

वयोमर्यादा ओलांडली: ६५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या ४.५ लाखांहून अधिक महिलांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. इतर योजनांचा लाभ: सुमारे ५ लाख महिला आधीच 'नमो शेतकरी योजने'चा लाभ घेत असल्याने त्यांना या योजनेतून वगळण्यात आले.

एकीकडे लाभार्थ्यांची संख्या कमी होत असतानाच, दुसरीकडे 'कॅग'ने शुक्रवारी एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार, लाडकी बहीण योजनेवर होणाऱ्या प्रचंड खर्चामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीवर मोठा ताण येऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या ३,५४२ कोटी रुपयांच्या खर्चाचे कोणतेही ठोस समर्थन करता येणार नाही, असे 'कॅग'ने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

महिला कल्याणासाठी राज्याचा होणारा खर्च २०२३-२४ मध्ये केवळ २६१.७८ कोटी रुपये होता. मात्र, २८ जून २०२४ रोजी 'लाडकी बहीण योजने'ला मंजुरी मिळाल्यानंतर, २०२४-२५ मध्ये हा खर्च थेट ३३,५१४.३६ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

## व्हिएतनाम बोट दुर्घटना; १५ भारतीय पर्यटकांचे पार्थिव मुंबईत दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)** – व्हिएतनाममधील फूक्कॉक बेटाजवळ झालेल्या भीषण स्पीडबोट अपघातात जीव गमावलेल्या १५ भारतीय पर्यटकांचे पार्थिव आज, १३ जुलै रोजी रात्री भारतात आणले जात आहे. हनोई येथील भारतीय दूतावासाने यासंदर्भात अधिकृत माहिती दिली असून, संपूर्ण देशावर या घटनेमुळे शोककळा पसरली आहे.

भारतीय दूतावासाने दिलेल्या माहितीनुसार, सर्व १५ मृतदेह व्हिएतनाम एअरलाईन्सच्या 'वीएन-९७९' या विशेष विमानाने हो ची मिन्ह सिटी येथून मुंबईकडे रवाना केले जाणार आहेत. हे विमान आज रात्री ९.३५ वाजता मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल होईल.

### संभाजीनगरमध्ये ऑईल कंपनीवर धाड

# पाम तेलासह २ कोटी ९३ लाखांचे खाद्यतेल जप्त



**छ. संभाजीनगर (प्रतिनिधी)** – राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने गेल्या महिनाभरापासून कारवाईंचा धडाका लावला असून गावखेड्यातल्या पानपट्टीपासून ते बड्या कंपन्यांपर्यंत अधिकारी पोहोचले आहेत. सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी या विभागाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यापासून कारवाईला वेग आला असून दूध भेसळ, हॉटेल्स, मेडीकलसह इतरही ठिकाणी विभागाने धाडी टाकत कारवाई केली आहे. गेल्याच आठवड्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दूध भेसळीची मोठी कारवाई केल्यानंतर आता खाद्यतेल कंपनीवरही छापा टाकून तब्बल सुमारे तीन कोटी रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगरात खाद्यतेलाच्या नावाखाली ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अन्न व औषध प्रशासनाने दोन ऑईल रिपॅकिंग युनिट्सवर धाड टाकून तब्बल २ कोटी ९३ लाख रुपयांहून अधिक किमतीचा संशयित निकृष्ट दर्जाचा खाद्यतेलाचा साठा जप्त केला आहे. कारवाईदरम्यान अस्वच्छ वातावरण, वापरलेले डबे पुन्हा वापरणे, फूड ग्रेड प्रमाणपत्रांचा अभाव आणि प्रयोगशाळेशिवाय तेलाचे पॅकिंग अशा गंभीर त्रुटी उघड झाल्या. या दोन्ही आस्थापनांचे परवानेही तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत.

'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने ११ जुलै रोजी पैठण येथील बागरिया अ‍ॅग्रो प्रॉडक्ट्स आणि छत्रपती संभाजीनगर शहरातील बागरिया व्हेजिटेबल प्रॉडक्ट्स या दोन ऑईल रिपॅकिंग युनिट्सवर अचानक छापा टाकला. तपासणीदरम्यान अत्यंत अस्वच्छ परिस्थितीत खाद्यतेलाचे रिपॅकिंग सुरू असल्याचे आढळून आले. तपासात वापरलेले टिन पुन्हा वापरले जात असल्याचे, यंत्रसामग्रीवर धूळ, गंज आणि घाण साचल्याचे, दुर्गंधीयुक्त तेलाचे टब, फूड ग्रेड प्रमाणपत्रांचा अभाव, तेलाची गुणवत्ता तपासण्यासाठी प्रयोगशाळा नसणे तसेच तांत्रिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती न केल्याचेही समोर आले.

दरम्यान, या कारवाईत पाम, सोयाबीन, कपाशी आणि अज्ञात वनस्पती तेलासह एकूण २ कोटी ९३ लाख ३५ हजार ६०३ रुपयांचा संशयित निकृष्ट दर्जाचा खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे. पुढील तपासासाठी तेलाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून, ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने दोन्ही आस्थापनांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत.

# भारताच्या लेकींनी लॉर्डसवर इतिहास रचला, इंग्लंडच्या महिला संघावर २७० धावांनी विजय



**मुंबई (प्रतिनिधी)** – हरमनप्रीत कौरच्या भारतीय महिला संघान लॉर्ड्सवर इंग्लडच्या महिला संघावर विजय मिळवत नवा इतिहास घडवला. जागतिक क्रिकेटची पंढरी अशी ओळख लाभलेल्या लॉर्ड्स वरती खेळवण्यात आलेल्या महिलांचा पहिला कसोटी सामना भारताने जिंकलाय. या कसोटी सामन्यामध्ये भारतीय महिलांनी इंग्लंडचा २७० धावांनी धुव्वा उडवला नाही. या कसोटीमध्ये भारताने इंग्लंडला विजयासाठी ४५७ धावांचं डोंगरा एवढा आव्हान दिलं होतं पण यजमान इंग्लंडला ते आव्हान पेलवलं नाही. चौथ्या आणि अखेरच्या दिवशी इंग्लंडचा दुसरा डाव १८६ धावांमध्ये आटोपला आहे. भारतीय महिलांच्या नावावरती वनडे विश्व चषक विजयानंतर आता लॉर्ड्सवर ऐतिहासिक कसोटी विजयाची नोंद झाली आहे.

लॉर्डसच्या १४२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदा महिला कसोटी सामना खेळवण्यात आला होता. या सामन्यात भारतानं इंग्लंडला २७० धावांनी पराभूत केलं आहे. भारतानं चौथ्या डावात इंग्लंड समोर विजयासाठी ४५७ धावचं आव्हान ठेवलं होतं. भारताला पहिल्या डावात ११५ धावांची आघाडी मिळाली होती. त्यानंतर दुसऱ्या डावात भारतानं ३४१ धावांवर डाव घोषित केला होता. इंग्लंडचा तिसऱ्या दिवशीच पराभव निश्चित झाला होता. कारण इंग्लंडनं ५९ धावांवर ५ विकेट गमावल्या होत्या. मात्र एमी जोन्स आणि सोफी एक्लेस्टोन यांच्या अर्धशतकामुळं इंग्लंडच्या विजयाचा आशा कायम होत्या. मात्र, संघ १८६ धावांपर्यंत पोहोचू शकला. भारताचा पहिला डाव २८५ धावांवर आटोपला होता. भारताच्या क्रांती गौडनं इंग्लंडच्या पहिल्या डावात ५ विकेट घेतल्या. त्यामुळं इंग्लंडचा संघ १७० धावांवर बाद झाला. पहिल्या डावातील आघाडीचा भारताला फायदा झाला. क्रांती गौडनं दोन्ही मॅचमध्ये मिळून ७ विकेट घेतल्या, तर स्नेह राणानं ६ विकेट घेतल्या. भारताच्या दुसऱ्या डावात यास्तिका भाटियानं ११३ धावांची खेळी केली. इंग्लंडच्या पहिल्या डावामध्ये पाच विकेट्स घेणारी क्रांती गौड आणि भारताच्या दुसऱ्या डावात शतक झळकावणारी यास्तिका भाटिया यांची नावही लॉर्डच्या ऐतिहासिक फलकावरती आता कायमची कोरली गेली आहेत.लॉर्डसला क्रिकेटची पंढरी तिथं कित्येक वर्षानंतर पहिल्यांदा भारत आणि इंग्लंड महिला संघांमधील कसोटी सामना पार पडला. या चार दिवसांच्या कसोटी सामन्यात भारतान विजय मिळवणं हा खरोखर एक मोठा इतिहास आहे.

## होर्मुझमधून जायचं असल्यास आम्हाला २० टक्के टोल द्यावा लागणार -डोनाल्ड ट्रम्प

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)** – अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष होर्मुझच्या सामुद्रधुनीवरुन पुन्हा वाढला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवरुन पुन्हा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझची सामुद्रधुनीसंदर्भात एक वक्तव्य केलं आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अमेरिकेचं वर्चस्व असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं. ट्रम्प यांचा दावा इराणला थेट आव्हान मानलं जातंय.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर होर्मुझची सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली आहे. ती इराणसोबत असताना खुली असेल किंवा इराण सोबत नसलं तरी खुली असेल, असं ट्रम्प म्हणाले. इराणची नाकेबंदी पुन्हा लागू केलीय, असं ट्रम्प म्हणाले. होर्मुझच्या सामुद्रधुनीला निष्पक्षपणानं सुरक्षित ठेवण्यासाठीच्या खर्चासाठी प्रत्येक जहाजावर २० टक्के दरानं टोल आकारला जाईल, असं ट्रम्प म्हणाले. ही प्रक्रिया लगेचच आणि तातडीनं सुरु होईल, असं ट्रम्प म्हणाले.

# मान्सून पुन्हा सक्रिय; पुढील १२ तासांत १४ राज्यात वादळी पावसाचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)** – दोन दिवसांपूर्वीपर्यंत उत्तर भारतातील राज्यांमध्ये धुमाकूळ घालणारा मान्सूनचा पाऊस पुन्हा एकदा ओसरताना दिसत आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये पावसाची कोणतीही चिन्हे नाहीत, तर मान्सूनचा हंगाम असूनही राजस्थानच्या बहुतांश भागात कडक उन्हाचा तडाखा जाणवत आहे. दरम्यान, हवामान विभागाने १४ राज्यांमध्ये वादळी पाऊस आणि विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा दिला आहे. तसेच, पुढील १२ तासांत वाऱ्याचा वेग ताशी ७५ किमीपर्यंत पोहोचण्याची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशाराही जारी करण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सूनचा पट्टा सध्या हरियाणा आणि उत्तर प्रदेशपासून मणिपूरपर्यंत विस्तारलेला आहे. याव्यतिरिक्त, उत्तर बांगलादेश आणि लगतच्या भागांवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती (सायक्लोनिक सर्क्युलेशन) निर्माण झाली असून, ती समुद्रसपाटीपासून १.५ किमी उंचीपर्यंत विस्तारलेली आहे. पुढील २-३ दिवसांत ईशान्य भारत, पश्चिम बंगाल आणि बिहारमधील काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्याच वेळी, पुढील ४-५ दिवसांत पूर्व उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, झारखंड, पश्चिम बंगाल, पंजाब, छत्तीसगड आणि आसाममध्ये मुसळधार पाऊस आणि वादळाचा इशारा दिला आहे.

हवामान विभागाने अरबी समुद्रातील मच्छीमारांसाठीही इशारा जारी केला आहे. १५ जुलैपर्यंत पूर्व-मध्य अरबी समुद्राच्या काही भागांत ताशी ५५ किमी वेगाने जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. मासेमारांना समुद्रात जाताना अत्यंत खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. खचऊ ने वायव्य, पश्चिम-मध्य आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारतात पुढील ६-७ दिवस मान्सूनचा टप्पा कमकुवत राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. हवामान प्रणाली कमकुवत झाल्याने पावसाची विश्रांती पाहायला मिळत आहे. घाटमाथ्यावर ५०० मिलिमीटर वरून पाऊस थेट शून्यावर आला आहे. पुढील पाच-सहा दिवस मुसळधार पावसाची शक्यता नाही. गेल्या आठवडाभर पुणे शहर, घाटमाथा आणि कोकणात मुसळधार बरसलेल्या पावसाने गेल्या दोन ते तीन दिवसांपासून अचानक विश्रांती घेतली आहे.

## महायुतीमध्ये महामंडळ वाटपाचा मुहूर्त ठरला

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यापासून रखडलेल्या आणि सत्ताधारी पक्षांतील नेत्यांसह कार्यकर्त्यांच्या नजरा लागून राहिलेल्या 'शासकीय महामंडळ' वाटपाचा अखेर मुहूर्त ठरला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, तिन्ही पक्षांमध्ये ४८-२९-२२ असा जागावाटपाचा अंतिम फॉर्म्युला निश्चित झाला असून, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या आगामी बैठकीत यावर अधिकृत शिक्कामोर्तब होणार आहे.


## Change In Name

My old name is **SHRIN BEGUM KHALEEL AHAMAD** which now I am Changing as new Name. **SHIREEN BEGUM KHALEEL AHEMAD.** Hence forth my all correspondence Will be done as pes my new name. Please consider, the same.

Adddress - H.No. 2-5-136/1, Khadakpura Main Road Nanded, J.K. Electircals Khadakpura Nanded 431601


## चेंबूर स्कुल बस दुर्घटना : कंत्राटदारास ५ लाखांचा दंड

**मुंबई (प्रतिनिधी)** – शहरातील चेंबूर येथील डायमंड गार्डन परिसरात ३० जून रोजी शाळेच्या बसवर पिंपळाचे झाड उन्मळून पडून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी नियुक्त चौकशी समितीने आपला अहवाल महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्याकडे सादर केला आहे. या अहवालात झाडांच्या सुरक्षेसाठी नेमलेल्या कंत्राटदारावर ५ लाख रुपये, तर देखरेख करणाऱ्या सल्लागार संस्थेवर २ लाख रुपयांचा दंड करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच झाडांच्या सुरक्षिततेसाठी मानक कार्यपद्धती तयार करून ती तातडीने लागू करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले आहेत. मात्र, चेंबूर झाड पडण्याच्या दुर्घटनेमध्ये रस्ते विभाग आणि उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांना क्लीनचीट देण्यात आली आहे.

अहवालानुसार, दुर्घटनेपूर्वी उद्यान विभागाने संबंधित परिसराची वेळोवेळी पाहणी केली होती आणि मान्सूनपूर्व छाटणीही करण्यात आली होती. तसेच पर्जन्यजल वाहिनीच्या कामादरम्यान झाडांच्या सुरक्षिततेबाबत उद्यान विभागाने रस्ते विभागाला वारंवार सूचना दिल्याने या दुर्घटनेत उद्यान विभाग किंवा रस्ते विभागाचा प्रथमदर्शनी कोणताही दोष आढळत नसल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ,ता. बिलोली यांचे कार्यालय

प्रकरण : मृत्यू नोंद घेणे बाबत.

अर्ज/आवक क्र.1538/2026

**!! जाहीर प्रगटन !!**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार **गंगामणी शंकर प्याटेकर**, वय 50 धंदा - मजुरी रा.हुनगुंदा ता.बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा 2023 मधिल कलम 11(2) व (3) अन्वये दि.24/03/2023 रोजी मृत्यु नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केले आहे.

अर्जदार **गंगामणी शंकर प्याटेकर**, रा. हुनगुंदा ता. बिलोली यांचे मयत पती नामे **शंकर हुलबा प्यादेकर**, यांचा दि.16/06/1991 रोजीची मृत्यु नोंद ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हुनगुंदा ता.बिलोली जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, अर्जदार यांचे **मयत पती नामे शंकर हुलबा प्यादेकर**, यांच्या मृत्युची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन **पंधरा दिवसात** या न्यायालयात स्वत: किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक 10/06/2026 रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी
बिलोली

### चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक: NND/26930/1860/24

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:__________

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक मोहम्मद अम्मार अँड अफ्फान सुभानी फाउन्डेशन फाउन्डेशन नांदेड टीक्यू.डीआईएस.नांदेड बाबत |

न्यासाचा पत्ता :- 5-2-33-1 किल्ला रोड,चौक मसजिद फतेह बुरुज नांदेड, 5-2-33-1 किल्ला रोड,चौक मसजिद फतेह बुरुज नांदेड, 5-2-33-1 किल्ला रोड,चौक मसजिद फतेह बुरुज नांदेड, नांदेड, नांदेड, नांदेड

अर्जदार - मोहम्मद अतीक़ अहमद सुभणी,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 19 अन्वये खालील मुद्‌यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | NSC | 1000.00 |
| 2 | MEMBERSHIP FESS | 1057.00 |

(अ) जंगम मिळकत:- रोख रु. 2057/- मात्र

(अक्षरी रुपये दोन हजार सतावन्न मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकत:- रोख रु. /- मात्र

(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक 25-05-2026 रोजी दिली|

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नांदेड

### जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

महात्मा गांधी पुतळ्या जवळ,स्टेशनरोड वजिराबाद, नांदेड-४३१६०१

दुरध्वनी क्र. (०२४६२) २३५०७७ | ई-मेल: nandedrdc@gmail.com
वेब साईट :- www.nanded,gov.in | ई फाईल-३४१९३३३ | फॅक्स क्र. :- (०२४६२) २३८५००

क्रमांक २०२४-आरबी-१-डेस्क-२-टे-५/१-RONOC-प्र.क्र.-५६ | दि.स्वाक्षरीत नमुद

**जाहिर प्रगटन**

(एक्सप्लोझीव नियम, २००८ चे कलम १०३ (३) (अे) नुसार)

विषयः- नियोजित भुमापन क्रं. ३६ (भाग) मौजे पांगरी ता.किनवट जि.नांदेड येथे नविन रिटेल आऊटलेटसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत

संदर्भः- मुख्य प्रादेशिक व्यवस्थापक (किरकोळ),हिंदुस्थान पेट्रोलियम कॉ.लि. सोलापूर यांचे पत्र HPCL-SOLAPUR/PANGRI/NOC, दिनांक २५-०४-२०२४

मुख्य प्रादेशिक व्यवस्थापक (किरकोळ),हिंदुस्थान पेट्रोलियम कॉ.लि. सोलापूर यांनी मौजे पांगरी ता.किनवट जि.नांदेड येथील भुमापन क्रं. ३६ (भाग) मध्ये नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. प्रस्तुत ठिकाणी नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी श्री प्रशांत विठ्ठलराव गडपाळे रा. आंबेगांव बु. कात्रज रोड, पुणे-४११०४६ यांना डिलरशिप दिलेली आहे.

सदरील पेट्रोलपंप उभारायचा भुखंड ( भुमापन क्रं. ३६ (भाग) मौजे पांगरी ता.किनवट जि.नांदेड ) हा श्री प्रशांत विठ्ठलराव गडपाळे यांच्या मालकीचा असुन सदर जमिनीचे एकूण क्षेत्र ०.२०.०० आर इतके आहे.

सबब, उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित जागेत हिंदुस्थान पेट्रोलियम कॉ.लि. सोलापूर यांना नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड येथे हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन पंधरा (१५) दिवसाचे आत लेखी आक्षेप/हरकती कार्यालयीन वेळात समक्ष सादर करावयात मूदती नंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

मूदतीत प्राप्त आक्षेप/हरकती सुनावणी घेऊन अंतीम करण्यात येतील याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

**अपर जिल्हादंडाधिकारी, नांदेड**


## Change In Name

My old name is **Sayyed Ashraf Husain** Which now I am changing to my new name **Sayyed Ashraf Husain Imtiyaz Husain** henceforth all my official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

Address - S/O Sayyed Imtiyaz Husain, 2-5-873, near masjid, Mill Area, Duleshah Rahman Nagar, Nanded- 431601

## Change In Name

My Old Name is **SHAIKH MAHEBOOB SHAIKH MUSA** which now I am changing as New Name **SHAIKH MOOSA SHAIKH MAHABOOB** Hence forth my all Correspondence will be done as per my new name Please consider the Same.

Address - **Shaikh Moosa**
**H.No. 1-12-315, Sailani Baba Colony, Kamareddy 503111 Telangana India.**

## Change In Name

My Old Name is **SULTANA BEGUM SHAIKH AFSAR** which now I am changing as New Name **SULTANA BEGUM UMAR KHAN** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - H.No. 1-11-42, Road No. 26, Near Madina Masjid, Mastanpura, Shivajinagar, Nanded 431602 Maharashtra**

## Change In Name

My Old Name is **MOHAMMAD TABISH AFTAB** which now I am changing as New Name **MOHD TABISH AFTAB** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address -
**Ali Nagar, Mafco Road, Nanded 431604**
**Mo.No. 9518338433**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# विचार करण्याची क्षमता गमावल्यामुळे महाराष्ट्राची पीछेहाट

## -गिरीश कुबेर यांचे प्रतिपादन



**नांदेड (प्रतिनिधी)** – तर्काच्या आधारे विचार करणे आणि प्रचलित मान्यतांची चिकित्सा करणे ही महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेची वैशिष्ट्ये होत. मात्र मराठी समाजाने असे करण्याचे सोडून दिले असल्यामुळे महाराष्ट्राची सर्व क्षेत्रात पीछेहाट झाली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक आणि दै. लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांनी केले.

प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या ९४ व्या जयंती निमित्ताने नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने 'महाराष्ट्राची वैचारिक परंपरा' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते.

भारतातील प्रबोधन परंपरेमध्ये महाराष्ट्राचे नेमके स्थान कोणते याबद्दल मांडणी करताना करकरीत बुद्धीवाद आणि तर्काधारित मांडणी या बाबी महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेची वैशिष्ट्ये होत, असे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. बंगालमधील प्रबोधन परंपरा धार्मिक सुधारणांच्या अंगाने पुढे गेली तर महाराष्ट्राने मात्र तर्काचा आधार घेतला असे ते पुढे म्हणाले.

एकेकाळी याच कारणांमुळे मराठी माणसांनी विविध क्षेत्रात भरीव योगदान दिले आणि महाराष्ट्राने देशाचे नेतृत्त्व केले, किंबहुना तर्काधारित विचार करण्याची पद्धत ही महाराष्ट्राने देशाला दिली असे त्यांनी नमूद केले. दुर्दैवाने महाराष्ट्राने आपली ही समृद्ध वैचारिक परंपरा सोडून दिल्यामुळे एकेकाळी सर्व क्षेत्रात आघाडीवर असलेली मराठी माणसे कोणत्याच क्षेत्रात आघाडीवर नाहीत अशी खंत कुबेर यांनी या वेळी व्यक्त केली. मात्र आपल्या अंगभूत क्षमतांमुळे मराठी माणसं ही विविध क्षेत्रात दुसऱ्या फळीमध्ये मोठ्या संख्येने आढळतात असे ते म्हणाले. आपल्या या विधानाच्या पुष्ट्यर्थ विविध मोठ्या कंपन्यांच्या कंपनी सेक्रेटरी या दुसऱ्या फळीतील महत्त्वाच्या पदावर अनेक मराठी माणसं दिसतात, पण अशाच मोठ्या कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर मात्र मराठी माणसं अभावाने दिसतात, अशी माहिती त्यांनी दिली. याचा अर्थ मराठी माणूस हा फार तर दुसऱ्या क्रमांकापर्यंतच पोहोचू शकतो, असा होतो असे कुबेर यांनी यावेळी सांगितले.

आपल्या व्याख्यानात त्यांनी महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेचा सविस्तर आढावा घेतला. या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकर यांनी घातला, असे नमूद करत त्यात भास्कर पांडुरंग तर्कडकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा फुले, मुक्ता साळवे, न्या. महादेव गोविंद रानडे, डॉ. रखमाबाई राऊत आदींनी त्यात मोलाची भर घातली असे त्यांनी सांगितले. प्रा. य. दि. फडके आणि प्रा. नरहर कुरुंदकर हे या वैचारिक प्रबोधन परंपरेचे अलीकडच्या काळातील प्रतिनिधी होत, असे कुबेर यावेळी म्हणाले.

महाराष्ट्राच्या समृद्ध अशा वैचारिक प्रबोधन परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याची नितांत गरज आहे, असेही ते यावेळी म्हणाले. तसे झाल्यास महाराष्ट्राला भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांची उकल करता येईल असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला. मात्र असे करण्यासाठी प्रा. कुरुंदकर यांच्यासारख्या स्वतंत्र बुद्धीच्या धाडसी विचारवंतांची गरज आहे आणि सरकारकडून लाभाची अपेक्षा ठेवणाऱ्यांकडून हे होणे नाही असा इशारा कुबेर यांनी यावेळी दिला.

नरहर कुरुंदकर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रा. सौ. श्यामल पत्की यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. विश्वाधार देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. दत्ता भगत आणि दीपनाथ पत्की यांनी कुबेर यांचे स्वागत केले तर प्रतिष्ठानचे विश्वस्त लक्ष्मण संगेवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास नांदेड एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष आणि माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे, आमदार हेमंत पाटील तसेच नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

> अलीकडेच डॉ. उदय कुमठेकर यांनी 'लोकायत दर्शनाचे वास्तव स्वरूप आणि समाजावरील प्रभाव' हा शोधप्रकल्प पूर्ण करून संस्थेत सादर केला. आपला संशोधन प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल याप्रसंगी डॉ. कुमठेकर यांचा कुबेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर नांदेडचे मल्हार लाठकर यांना "Generative I tools for higher education in Nanded District' तसेच अहिल्यानगरचे डॉ. योगिता खेडकर आणि डॉ. वसु भारद्वाज यांना संयुक्तरित्या "Comparative Study of Rational Emotive Behaviour Therapy by lbert Ellis and Panchghatak Vivek by Ramdas Swami" या विषयांवरील संशोधनासाठी संशोधन वृत्ती देण्यात आल्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

# मराठा आरक्षण आंदोलनातील मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाखांची मदत

## ♦ आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते धनादेशाचे वितरण



**लोहा (प्रतिनिधी)** – मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत्यू पावलेल्या युवकांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रत्येकी १० लाख रुपयांच्या आर्थिक मदतीचे धनादेश आज माजी खासदार तथा विधिमंडळ उपविधान समितीचे प्रमुख आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठपुराव्यामुळे शासनाकडून मंजूर झालेली ही मदत सोमवारी लोंढेसांगवी, वाका आणि धनज खुर्द या गावांमध्ये जाऊन संबंधित कुटुंबीयांना देण्यात आली. यावेळी चिखलीकर यांनी कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

या मदतीअंतर्गत लोंढेसांगवी येथील कै. उद्धव शिवाजीराव लोंढे यांच्या मातोश्री जयाबाई शिवाजीराव लोंढे, वाका येथील कै. आबाजी गोविंदराव हंबर्डे यांच्या मातोश्री राजाबाई गोविंदराव हंबर्डे तसेच धनज खुर्द येथील कै. रुपेश बळवंतराव ताटे यांचे वडील बळवंतराव मारोती ताटे यांना प्रत्येकी १० लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला.

यावेळी लोहाचे तहसीलदार विठ्ठल परळीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे, शहराध्यक्ष मोहसीन खान पठाण, माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, माजी उपसभापती शंकरराव ढगे, बालाजी पाटील मारतळेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष गायकवाड, वाका येथील माजी सरपंच शास्त्री, रमेशराव सावळे, वीरभद्र राजुरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# विद्यापीठात डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आज व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील 'डॉ. शंकरराव चव्हाण अध्ययन केंद्रा'च्या वतीने डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त एका 'विशेष व्याख्यानाचे' आयोजन करण्यात आले आहे. हे व्याख्यान येत्या मंगळवार, दि. १४ जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी १२:३० दरम्यान आयोजित करण्यात आले असून, या कार्यक्रमात 'मराठवाडा : काल, आज व उद्या' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. ज्ञानेश्वर पवार यांनी दिली आहे.





विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. मनोहर चासकर हे भूषवणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून सिंचन प्रकल्पग्रस्त पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी उपाध्यक्ष माधव भंडारी उपस्थित राहणार असून, ते आपल्या व्याख्यानात विचार मांडणार आहेत. या निमित्ताने डॉ. शंकरराव चव्हाण यांचा विकासविषयक दृष्टिकोन आणि मराठवाड्यापुढील आजची आव्हाने यांवर चर्चा होणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेच्या अभिवादनाने होणार असून, त्यानंतर कुलसचिव प्रा. ज्ञानेश्वर पवार हे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत करतील. या प्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. अशोक महाजन आणि व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण हे आपले मनोगत व्यक्त करणार आहेत.

# सिडको काँग्रेसच्या वतीने प्रेरणा अभियानाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – ज्येष्ठ नेते कै. डॉ. शंकरराव चव्हाण व कै. खा. वसंतराव चव्हाण जयंतीचे औचित्य साधून दि. १४ जुलै ते १५ ऑगस्ट दरम्यान प्रेरणा अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती सिडको ब्लॉक अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी दिली आहे.

खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात व उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या मार्गदर्शनाने सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्यावतीने कै. डॉ. शंकरराव चव्हाण व कै. खा. वसंतराव चव्हाण जयंती दरम्यान प्रेरणा अभिमान राबविण्यात येणार आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात आज पेन्शन अदालत

**नांदेड (प्रतिनिधी)** – महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी जुलै २०२६ महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी १४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतली आढावा बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील शासकीय विश्रामगृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक दि. १३ रोजी संपन्न झाली. या आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर होते तर आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. २२ ते २८ जुलै २०२६ दरम्यान जनसेवा सप्ताहांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची सविस्तर माहिती जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांनी दिली.

यामध्ये आरोग्यविषयक उपक्रम, पर्यावरण संवर्धनविषयक उपक्रम, सामाजिक उपक्रम, महिला सक्षमीकरण विषय उपक्रम, शेतकरी महिला सन्मान कार्यक्रम, कृषी विषयक उपक्रम, युवा संकल्प शिबीर, अल्पसंख्याक सेवा संकल्प, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आदी उपक्रम राबविण्यात यावे, असे आवाहन होटाळकर यांनी केले.

यावेळी माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, माजी. आ. मोहन हंबर्डे, माजी आ. अविनाश घाटे, माजी उपमहापौर सुरजीतसिंग गिल, उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पा. रावणगावकर, प्रदेश सरचिटणीस वसंत पा. सुगावे, जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे, अशोक पा. मुगावकर, युवकचे जिल्हाध्यक्ष बालाजी पा. शिंदे, डॉ. उत्तमराव सोनकांबळे, युवक शहराध्यक्ष मोहसीन खान यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.













# बाबुराव मामडे यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सिडको परिसरातील ज्येष्ठ नागरिक बाबुराव श्रीराम मामडे यांचे अल्पशा आजाराने दि. १३ जुलै रोजी निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ७६ वर्षे होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, चार मुली, सून, जावई आणि नातवंड असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सिडको येथील स्मशानभूमीत सोमवार, दिनांक १३ जुलै रोजी दुपारी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. दीपक मामडे यांचे ते वडील होत.
















**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.



फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com